कृषीवल
रायगड, शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५
किंमत ४ ₹

## दीड लाख गोविंदांना विमाकवच

**मुंबई :** महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या लाखो गोविंदांसाठी एक आनंदाची बातमी आहे. गेल्या काही वर्षांपासून दहीहंडीच्या सरावादरम्यान आणि प्रत्यक्ष उत्सवादरम्यान होणाऱ्या अपघातांमुळे अनेक गोविंदांना दुखापतींचा सामना करावा लागतो. यावर तोडगा काढण्यासाठी आता राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. यावर्षी, सुमारे १.५० लाख गोविंदांना विमा सरंक्षण देण्यात येणार आहे. राज्य सरकार गोविंदा समन्वय समिती (महा.) च्या पान २ वर

HIRING ALERT
Looking For South Indian Cook
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

### सरकारच्या तिजोरीत खडखडाट

# महामार्गाची खडतर वाट



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

राज्य सरकारकडील आर्थिक टंचाईमुळे विरार–अलिबाग बहुद्देशीय महामार्ग रखडल्याने जेएनपीए ते दिल्ली हे अंतर आठ तासांत पार करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी महामार्गाचे स्वप्न अधुरे राहण्याच्या मार्गावर आहे. त्याऐवजी बडोदा–मुंबई महामार्गातील 'मिसिंग लिंक' तयार करण्यासाठी नवा पर्याय शोधण्याचा प्रयत्न राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सुरू केला आहे. आयसीटी कंपनीला याबाबतचा तपशीलवार प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम सोपवले असून, ऑगस्टअखेरपर्यंत ही कंपनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासमोर त्याबाबतचा अहवाल मांडणार आहे.

- **विरार–अलिबाग महामार्ग रखडल्याचा परिणाम**
- **मुंबई–दिल्ली महामार्गाची सुसंगतता विस्कळीत**

**1**

**2016** साली या रस्त्याची आखणी होत असताना राज्य सरकार आणि केंद्र सरकारमध्ये मोरबे ते कोन या मार्गिकेसाठी दोन वेगवेगळ्या प्राधिकरणांनी काम करण्यापेक्षा एकाच प्राधिकरणाने ही जबाबदारी उचलण्याचे ठरले.

**2**

**2025** अखेरपर्यंत हे दोन्ही महामार्ग वाहतुकीसाठी खुले करण्याचे नियोजन होते. लाडकी बहीण योजनेमध्ये सरकारचा अतिरिक्त खर्च झाल्याने हा प्रकल्प रखडला असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे बडोदा–मुंबई हा राज्यातील १५३ किलोमीटरचा महामार्ग वापरात येण्यासाठी या हालचालींना वेग आला आहे.

केंद्र सरकारच्या 'विकसित भारत' संकल्पनेतून 'मुंबई–दिल्ली महामार्ग' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला होता. या मार्गाच्या माध्यमातून जेएनपीए बंदरातून थेट दिल्लीपर्यंत अवघ्या आठ तासांत पोहोचणे शक्य पान २ वर

### असा असेल नवा मिसिंग लिंक मार्ग

**सध्या आयसीटी कंपनीकडून या प्रकल्पाचे काम सुरू आहे. नवा मिसिंग लिंक यामार्गे हा महामार्ग पनवेल तालुक्यातील मोरबे, महाळुंगी, कानपोली, पाले बुद्रुक, वळवली, टेंभोडेमार्गे कळंबोली सर्कल येथील आठपदरी महामार्गाला जोडण्याचे नियोजन असल्याचे सांगितले जाते. वाहतुकीला जलद व सुलभ मार्ग देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प पनवेलच्या भविष्यातील दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. दिल्ली–मुंबई, बडोदा–मुंबई हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण बांधत आहे. तर, विरार–अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका राज्य सरकार बांधत आहे.**

### रायगडच्या सागरी किनाऱ्याची सुरक्षा पुन्हा ऐरणीवर

# काशीद किनारी चरससदृश्य पाकिटं

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील काशीद समुद्रकिनारी चरससदृश्य अमली पदार्थांची पाकिटे वाहून आली आहेत. मुरुड पोलिसांनी सदरची पाकिटं जप्त केली असून, त्यांची किंमत जवळपास ५५ लाखांच्या घरात आहे. याप्रकरणी मुरुड पोलिसांत अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी ही पाकिटे कुठून आणि कशी आली, कोणी टाकली, हे अद्यापही स्पष्ट होऊ शकले नाही. दरम्यान, यामुळे रायगडच्या समुद्रकिनाऱ्याची सुरक्षा पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरली आहे.

दरम्यान, मुरुड काशिद समुद्रकिनारी संशयास्पद प्लास्टिक गोणी असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत मुरुड पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील, पोलीस हवालदार जनार्दन गदमळे, हरी मेंगाळ, पोलीस शिपाई



● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

- **मुरुड पोलिसांकडून ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त**
- **अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल**

मकरंद पाटील, निखिल सुर्ते, कैलास निमसे, संतोष मराडे, सुमित उकार्डे आदींचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी संशयास्पद प्लास्टिक गोणीची तपासणी केली असता त्या गोणीमध्ये चरससदृश्य अंमली पदार्थ दिसून आले. त्यानंतर अजून किनारी परिसरात कुठे गोणी किंवा पाकिटे मिळतात का, याची खात्री करण्यासाठी संपूर्ण परिसराची तपासणी करण्यात आली. यामुळे समुद्रकिनाऱ्याला काही काळ छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते. या गोणींमध्ये ११ किलो १४८ ग्रॅम वजनाचा साधारणतः ५५ लाख ७४ हजार रुपये किमतीचा चरससदृश्य अमली पदार्थ असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. दरम्यान, अज्ञाताविरोध मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रायगडचा किनारा हा कायमच सागरी सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील म्हणून ओळखला जातो. मुंबईला लागून असल्याने पान २ वर

## वे|ध|क

### उपराष्ट्रपती पदासाठी ९ सप्टेंबरला निवडणूक

**नवी दिल्ली :** जगदीप धनखड यांनी २१ जुलै रोजी अचानक आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे हे पद रिक्त झालं आहे. मात्र, आता येत्या ९ सप्टेंबर रोजी उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक होणार आहे. निवडणूक आयोगाने या निवडणुकीचं संपूर्ण वेळापत्रक जारी केलं आहे. निवडणूक आयोगाच्या परिपत्रकारनुसार, ७ ऑगस्ट रोजी अधिसूचना जारी केली जाणार आहे. तर, २१ ऑगस्ट ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. त्यानंतर २२ ऑगस्ट रोजी अर्जांची छाननी होईल. तसेच २५ ऑगस्टपर्यंत ही उमेदवारी मागे घेता येणार आहे. यावेळी एकापेक्षा जास्त अर्ज वैध ठरल्यास ९ सप्टेंबरला रोजी मतदान आणि त्याच दिवशी संध्याकाळी निकाल जाहीर होणार असल्याचं निवडणूक आयोगाने सांगितलं आहे.

### 'राजकारणात सत्य बोलणे अडचणीचे'

**पुणे :** राजकारणात सत्य बोलणे अडचणीचे असते, मात्र तरीही सकारात्मकता ठेवून सत्य बोलणे गरजेचे असते. लोकमान्यांच्या नावाचा पुरस्कार मिळावा इतका मोठा मी नाही. सगळी मोठी माणसे मोठी असतातच असे नाही, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. लोकमान्य टिळक ट्रस्टच्या वतीने देण्यात येणारा लोकमान्य टिळक पुरस्कार ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांच्या हस्ते शुक्रवारी दुपारी टिळक स्मारक मंदिरात गडकरी यांना देण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

### अनिल अंबानींना ईडीचे समन्स

**मुंबई :** रिलायन्स ग्रुपचे अध्यक्ष अनिल अंबानी यांना १७,००० कोटी रुपयांच्या कथित कर्ज घोटाळ्याच्या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) चौकशीसाठी समन्स बजावले आहे. अनिल अंबानी यांना ५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील ईडी मुख्यालयात चौकशीसाठी हजर राहण्यास सांगण्यात आलं आहे. ईडीच्या तपासात येस बँकेने २०१७–१९ दरम्यान रिलायन्स ग्रुपच्या कंपन्यांना दिलेल्या ३,००० कोटींच्या कर्जाची अनियमितता आढळली आहे.

## एसटी बस-टेम्पोची धडक

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

रखडलेल्या महामार्गाची सध्या पावसामुळे दुर्दशा झालेली असतानाच अपघातांचे सत्रही सुरूच आहे. यातच नागोठण्याजवळील कोलेटी येथे एसटी बस व मालवाहू आयशर टेम्पो यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात टेम्पोच्या केबिनचे मोठे नुकसान अडकून पडलेला टेम्पोचालक दिनेश यादव हा गंभीर जखमी झाला असून,



त्याच्या उजव्या पायाला फ्रॅक्चर झाले आहे. तर एसटी बसमधील दहा प्रवासी जखमी झाले आहेत. दरम्यान, टेम्पोत पान २ वर

## प्रज्ज्वल रेवण्णा दोषी

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

कर्नाटकच्या हासन लोकसभेचे माजी खासदार आणि देशाचे माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू प्रज्ज्वल रेवण्णा (३४) यांना बलात्कार प्रकरणात दोषी ठरविण्यात आले आहे. कर्नाटकच्या विशेष न्यायालयाने शुक्रवारी हा निकाल दिला. घरकाम करणाऱ्या ४७ वर्षीय महिलेवर रेवण्णा कुटुंबाच्या फार्महाऊसमध्ये बलात्कार केल्याप्रकरणी प्रज्ज्वल रेवण्णांना दोषी ठरवले गेले आहे.

## साळाव–तळेखार रस्ता चिखलात

**| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |**

साळाव ते तळेखार रस्त्याचे रुंदीकरण सुरू असून, या कामासाठी नेमण्यात आलेला परप्रांतीय ठेकेदार कोकणातील पावसाची तीव्रता आणि भौगोलिक परिस्थिती न समजल्याने रस्त्याचे काम अक्षरशः कच्च्या पायावर उभे आहे. सध्या या रस्त्यावरुन प्रवास करणं म्हणजे जीव मुठीत घेऊन वाटचाल करण्यासारखे झाले आहे. रस्त्याचे




अस्तित्वच हरवले असून, थेट मातीच्या दलदलित गाड्या आणि पावसाच्या पाण्यात माणसं अडकून पडत आहेत. चिखलमय रस्ता तुडवताना जनता अक्षरशः त्रस्त झाली आहे. परंतु, ठेकेदार मस्त आणि नेते स्वस्थ अशी सध्याची स्थिती असल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.

संबंधित ठेकेदाराने पावसाळ्याच्या पान २ वर

## आज पनवेलमध्ये लाल वादळ

**शेकापचा ७८ वा वर्धापन दिन होणार साजरा**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारा शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन सोहळा शनिवारी (दि. २) सकाळी पनवेलमध्ये साजरा केला जाणार आहे. पक्षाचे हजारो कार्यकर्ते या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. त्यामुळे शेकापचे 'लाल वादळ' पनवेलमध्ये धडकणार असून, यावेळी शेकापचे मोठे शक्तीप्रदर्शन होणार आहे. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्यासह महाविकास आघाडीमधील दिग्गज नेतेदेखील शेकापच्या पान २ वर




### महाविकास आघाडीचे कार्यकर्तेदेखील राहणार उपस्थित

**शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे हजारो कार्यकर्ते सहभागी होणार आहे. त्यांच्यासोबत महाविकास आघाडीचे कार्यकर्तेदेखील उपस्थितीत राहणार आहेत. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची या मेळाव्याला प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे त्यांचे विचार ऐकरण्यासाठी मनसेचे असंख्य कार्यकर्तेदेखील उपस्थित राहणार असल्याची माहिती मनसेचे नेते योगेश चिले यांनी दिली. तसेच महाविकास आघाडीतील काँग्रेसचे आ. विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे व शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे नेते खा. संजय राऊत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे असंख्य कार्यकर्तेदेखील दिग्गज नेत्यांचे विचार ऐकण्यासाठी या मेळाव्यात सहभागी होणार आहेत.**

## दत्ता भरणे नवे कृषीमंत्री

**| मुंबई | प्रतिनिधी |**



कृषीमंत्री माणिकराव कोकाटे पावसाळी अधिवेशनादरम्यान विधिमंडळाचे कामकाज सुरू असताना रमी खेळत असतानाचा कथित व्हिडिओ बाहेर आल्यामुळे वादाच्या भोवऱ्यात अडकले होते. विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत होती. मात्र, कोकाटेंचा राजीनामा न घेता त्यांचा कृषीमंत्रीपदावरुन उचलबांगडी करण्यात आली आहे. रमी खेळणे त्यांच्या अंगलट आले असून, मंत्री दत्ता भरणे यांच्याकडे कृषीमंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्यात पान २ वर






पान १ वरून

## काशीद किनारी चरससदृश्य पाकिटं

येथील सागरी सुरक्षेचे महत्त्व अधिक आहे. दोन वर्षांपूर्वी २०२३ सालीसुद्धा अशाप्रकारे रायगड जिल्ह्यात अनेक समुद्रकिनारी अशाच प्रकारे अंमली पदार्थांची पाकिटे सापडली होती. दरम्यान, आज पुन्हा एकदा मुरुड किनारी अमली पदार्थांची पाकिटे सापडल्याने या घटनेकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. अन्यथा अशा घटना सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत घातक ठरु शकतील, अशा प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

सदरची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी अलिबाग प्रतीक्षा खेतमाळीस घटनास्थळी पोहोचून सदर माहिती घेऊन मिळालेला चरससदृश्य अमली पदार्थ जप्त करुन सीलबंद करण्यात आला.

## एसटी बस-टेम्पोची धडक

अडकलेल्या चालकाला स्थानिक नागरिकांनी लोखंडी साखळीच्या सहाय्याने टेम्पोचा आतील भाग मागे ओढून मोकळे केले. ही दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि.१) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घडली.

या अपघाताबाबत अधिक माहिती अशी की, शिवथरघळ-ठाणे असा प्रवास करणाऱ्या एसटी बसचा चालक दिनकर गोविंद डोंगरे (३६) रा. गोठाता, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर हा ठाणे आगाराची बस शिवथरघळ ते ठाणे अशी ५० प्रवासी घेऊन ठाणे येथे जात होता. दरम्यान, बस कोलेटी याठिकाणी आली असता, एकेरी रोड असल्याचे माहिती असूनसुद्धा त्याकडे दुर्लक्ष करून त्यांनी बस अतिवेगाने चालवून मुंबई बाजूकडून गोवा बाजूकडे येणाऱ्या आयशर टेम्पोला समोरासमोर धडक दिली.

या भीषण अपघातात आयशर टेम्पो चालक दिनेश वासुदेव यादव (४८) रा. वापी, गुजरात याच्या उजव्या पायास गंभीर जखमा होऊन त्याच्या पायाला फ्रॅक्चर झाल्याने त्याच्यावर नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. आदित्य शिरसाट यांनी प्राथमिक उपचार केले. त्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले.

या अपघातात एसटी बसमधील जमील मोहम्मद अली येलूकर (२१) रा. वडवली, माणगाव, सोनू भागुजी शीद (५४) रा. वडपाली, माणगाव, अनघा आतील सावंत (५५) रा. महाड, सायली सुनील कोंढाळकर (२०) रा. वरंध, महाड, निर्मिती निलेश कडू (१९) रा. माणगाव, आर्या साळुंखे (२२) रा. माणगाव, संतोष सखाराम शिंदे (५२) रा. राजावली, महाड, मुकुंद संजय कदम (२५) रा. खर्डी, महाड, रोहिणी अरुण भोनकर (२५) रा. पीडब्ल्यूडी ऑफिस माणगाव, सोनाली सोनू शिंदे (४८) रा. वडपाले, माणगाव हे दहा प्रवासी जखमी झाले असून, त्यांना किरकोळ दुखापती व मुक्का मार लागला आहे. जखमी प्रवाशांवर प्राथमिक आरोग्य केंद्र नागोठणे येथे उपचार सुरू आहेत.

दरम्यान, महामार्गावरून मुंबईकडे प्रवास करीत आलेले राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांना या अपघाताची माहिती मिळताच त्यांनी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात येऊन जखमी प्रवाशांची विचारपूस केली तसेच अपघाताची माहिती घेतली. यावेळी महामार्गाची पाहणी करण्यासाठी आलेले अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरेसुद्धा उपस्थित होते. या अपघाताची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे सपोनि सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस करीत आहेत.

## दीड लाख गोविंदांना विमाकवच

माध्यमातून तब्बल १.५० लाख गोविंदांना 'ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी'द्वारे विमा संरक्षण देणार आहे. या योजनेसाठी १ कोटी १२ लाख ५० हजार रुपये इतक्या रकमेचा विमा प्रस्ताव अंतिम करण्यात आला आहे.

दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या गोविंदांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारने जाहीर केलेल्या या विमा योजनेत अपघातानुसार वेगवेगळ्या प्रकारची भरपाई दिली जाणार आहे.त्यानुसार दुर्दैवाने एखाद्या गोविंदाचा दहीहंडीच्या वेळी मृत्यू झाल्यास, त्याच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची भरपाई मिळेल. दोन्ही डोळे किंवा दोन्ही हात-पाय गमावल्यासदेखील १० लाख रुपयांची भरपाई दिली जाईल. अपंगत्व: एक डोळा, एक हात किंवा एक पाय गमावल्यास ५ लाख रुपयांची भरपाई मिळेल. याव्यतिरिक्त, मानवी मनोरे रचताना झालेल्या दुखापतींवर उपचारासाठी १ लाख रुपयांपर्यंतचा वैद्यकीय खर्चही या विमा योजनेत समाविष्ट आहे.

## आज पनवेलमध्ये लाल वादळ

वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी उपस्थितीत राहणार आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची या मेळाव्यास प्रमुख उपस्थिती असणार आहे. येणारी शेकडो वाहने उभी करण्यासाठी वाहनतळ, हजारो कार्यकर्त्यांना बसण्यासाठी खुर्च्यांची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची चोख व्यवस्था मेळाव्याच्या ठिकाणी करण्यात आली आहे. मेळावा यशस्वी करण्यासाठी कार्यकर्ते मागील काही दिवसांपासून दिवस-रात्र मेहनत घेत आहेत.

शेतकरी कामगार पक्षाचा ७८ वा वर्धापन दिन शनिवारी साजरा होणार आहे. यानिमित्त तालुक्यातील नवीन पनवेल येथील गुरुद्वाराशेजारील मैदानात भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस माजी आमदार जयंत पाटील, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासोबत शिवसेना उबाठा गटाचे खासदार संजय राऊत, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्यासोबत महाविकास आघाडीतील प्रमुख नेते मेळाव्यात उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहे. दरम्यान, मेळाव्याच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या सभामंडपात मोठे व्यासपीठ उभारण्यात आले आहे. मैदानात पाच मोठे एलईडी स्क्रीन लावण्यात आले आहेत. मेळाव्यासाठी राज्यभरातून येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या वाहनांसाठी तीन ते चार ठिकाणी वाहनतळ तयार करण्यात आले आहेत. पिण्याच्या पाण्याचे टँकर्स, पाण्याच्या बाटल्यांची व्यवस्थादेखील करण्यात आली आहे. कार्यकर्त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी नियोजन करण्यात आले आहे. २० ठिकाणी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली आहे. मेळाव्याला २५ हजारांहून अधिक कार्यकर्ते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना बसण्यासाठी हजारो खुर्च्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

शेतकरी कामगार पक्षाचा मेळावा कार्यकर्त्यांसाठी एक पर्वणी आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून पनवेलमध्ये सभामंडपाचे काम सुरु होते. हजारो कार्यकर्ते बसतील असा भव्यदिव्य मंडप उभारण्यात आला आहे. शेकापचे नेते माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या देखरेखेखाली या मंडपाचे काम करण्यात आले आहे. सध्या पावसाळी हंगाम सुरू आहे. मेळाव्यासाठी येणाऱ्या कार्यकर्त्यांची पावसामुळे गैरसोय होऊ नये, म्हणून सुरक्षेच्या दृष्टीने सभामंडप बांधण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून शुक्रवारपासूनच कार्यकर्ते पनवेलमध्ये दाखल झाले आहेत.

## महामार्गाची खडतर वाट

होणार होते. या महामार्गाचा एक भाग असलेल्या बडोदा-मुंबई महामार्गाचे काम पनवेल तालुक्यातील मोरबे गावापर्यंत अंतिम टप्प्यात आले आहे. पुढील वर्षापासून हा महामार्ग वाहतुकीसाठी खुला होण्याच्या तयारीत असला तरी या महामार्गाला जेएनपीए बंदराशी जोडण्यासाठी आवश्यक असणारा विरार-अलिबाग बहुद्देशीय महामार्ग रखडल्यामुळे संपूर्ण मार्गाची सुसंगतता विस्कळीत झाली आहे.

महाराष्ट्र सरकारकडे भूसंपादन बांधकामासाठी निधीची कमतरता असल्याने हा प्रकल्प रखडला आहे. पुढील काही महिन्यांत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होणार असल्याने शहरातील शीव-पनवेल, कळंबोली-मुंब्रा-पनवेल, कल्याण-तळोजा या महामार्गांवरील वाहतूक कोंडी दूर करण्याची संधीही गमावली आहे. या रखडलेल्या अवस्थेमुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एप्रिल महिन्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मोरबे ते कळंबोलीपर्यंत 'मिसिंग लिंक'चा नव्याने प्रकल्प अहवाल तयार करण्याचे आदेश दिले आहेत.

## साळाव-तळेखार रस्ता चिखलात

काळातही काम सुरू ठेवत तात्पुरती मलमपट्टी करत मनमानी केली. रस्त्याचे कोणतेही योग्य पाणी नियोजन न केल्यामुळे शेतात पाणी-माती जात असून शेतीही संकटात सापडली आहे. या मार्गाचा पर्यायी रस्ताही उपलब्ध नाही, त्यामुळे नागरिक अडकले आहेत आणि अपघाताचं प्रमाणही वाढलं आहे.मागील सहा महिन्यांपासून नागरिक त्रस्त असून, अजूनही पावसाळ्याचे महिने शिल्लक आहेत. त्यातच गणपती, सणासुदीचे दिवस जवळ आलेले असताना या मार्गावरून प्रवास करणं म्हणजे जिवावर उठण्यासारखं आहे. ठेकेदाराच्या चुकीच्या कामकाजावर नेते मंडळी गप्प आणि प्रशासन तर मूकदर्शक. साळाव चेक पोस्टवरील कॅमेरे बंद असून, ओव्हरलोड वाहतूक खुलेआम सुरू आहे. पोलीस प्रशासनाची मूक संमती असल्याची जनतेत चर्चा आहे.

दरम्यान, संतप्त जनतेकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सार्वजनिक बांधकाम विभाग या प्रश्नाकडे कानाडोळा का करत आहेत?, स्थानिक नेत्यांच्या बंद दारामागे चाललेल्या सौद्यांमुळेच का हा रस्ता जनतेसाठी मृत्यूचा सापळा ठरतोय?, साळाव चेक पोस्टवरील बंद कॅमेरे सुरू होणार की नाही? गणपतीत जर मोठा अपघात झाला, नागरिकांचा बळी गेला तर जबाबदार कोण? असा सवाल विचारला जात आहे.

या रस्त्याने प्रवास करणाऱ्या दूधवाल्यांपासून ते शालेय विद्यार्थ्यांपर्यंत साऱ्यांचे जीवन धोक्यात का टाकलं जातंय? भ्रष्टाचार आणि दुर्लक्षाच्या दलदलित विकास हरवला, रस्त्याचा निधी मिळूनही कामाची गती नाही, दर्जा नाही आणि उत्तरदायित्व तर दूरच. जनतेला त्रास सहन करूनही कोणी त्यांची दखल घेत नाही. शेतकरी, व्यापारी, विद्यार्थ्यांची रोजची गैरसोय त्यांच्याच पैशातून उभ्या राहिलेल्या 'अपयशाचं स्मारक' ठरत आहे. जनतेमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत की, या रस्त्यावर एखादा जीव गमावल्यावर जर संबंधित खात्यांनी आणि नेत्यांनी टाळं लावलेली तोंडं उघडली, तर ती उघडण्यापूर्वीच जनतेचा रोष त्यांना उघडं पाडेल.

## दत्ता भरणे नवे कृषीमंत्री

आली आहे. मंत्रालयाच्या सामान्य प्रशासन विभागाने गुरुवारी रात्रीच या बदलाची अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी माणिकराव कोकाटे यांना आपल्या भेटीसाठी बोलवून कडक शब्दांत तंबी दिली होती. परंतु, सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव त्यांच्या मंत्रीपदाचा राजीनामा घेतला नव्हता. मात्र, खातेबदलाची शिक्षा त्यांना दिली आहे. सभागृहाच्या कामकाजातही देहभान हरपून रमी खेळणाऱ्या कोकाटेंकडे रात्री उशिरा क्रीडा खात्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.कोकाटे यांच्याकडून काढून घेतलेल्या कृषी खात्याची जबाबदारी अजित पवार यांचे विश्वासू समजले जाणारे दत्ता भरणे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. माणिकराव कोकाटे यांच्याकडे क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. दरम्यान, मी रमी खेळलो नाही, दोषी आढळलो तर नागपूर अधिवेशनात राजीनामा देईन, अशी प्रतिक्रिया माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे.


### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक मंजुनाथ व्ही आचार्य यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**शेतीजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे शेलू, ता. कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं ४४/८ एकुण ०.०९.०० गुंठे जागा, तसेच सर्व्हे नं ४२/९ एकुण ०.१०.०० विकत घेणार आहेत. तरी शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा,ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०२/०८/२०२५

**ॲड. वैभव अशोक शिंदे**
पत्ता. मु.पो कर्जत, ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ७७४४८५१४६९



### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
**उप प्रादेशिक कार्यालय रायगड-२**

**पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना**

**मे. टोरन्ट PSH3 प्रा. लि.**, ता. कर्जत, जि. रायगड यांच्या प्रस्तावित साईडोंगर-१-कर्जत उदंचन जलविद्युत प्रकल्प (३००० मेगावॅट) उभारणीसाठी पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणेकामी प्रस्ताव म. प्र. नि. मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. या संदर्भात सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाच्या सभोवतालच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सदरील जनसुनावणीसाठी उपस्थित राहता येईल.

सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर पर्यावरणविषयक जनसुनावणीचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**ठिकाण** : सर्व्हे नं. २७, गौरमाता मंदिराजवळ, मौजे गौरकामत, ग्रामपंचायत वडप, ता. कर्जत, जि. रायगड
**दिनांक** – ०३.०९.२०२५
**वार** – **बुधवार**
**वेळ** – **दु. ०३.०० वाजता**

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात-

**प्रादेशिक कार्यालय / उप-प्रादेशिक कार्यालय रायगड-२,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,**
**६ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४.**
**ई-मेल : sroraigad2@mpcb.gov.in**

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१) मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड.
२) मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
३) जिल्हा परिषद कार्यालय, अलिबाग, रायगड.
४) जिल्हा परिषद कार्यालय, पुणे.
५) जिल्हा उद्योग केंद्र, रायगड.
६) जिल्हा उद्योग केंद्र, पुणे.
७) मा. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ८, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई-२२.
८) प्रादेशिक कार्यालय, रायगड आणि उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-२ म. प्र. नि. मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४.
९) प्रादेशिक कार्यालय, पुणे आणि उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, म. प्र. नि. मंडळ, जोग सेंटर, दुसरा आणि तिसरा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रोड, पुणे- ४११ ००३.
१०) झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर- ४४० ००१.
११) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२) मा. पोलिस अधिक्षक, ता. अलिबाग, जि. रायगड.
१३) मा. उपविभागीय अधिकारी कर्जत, उपविभाग कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
१४) मा. तहसिलदार कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
१५) मा. गट विकास अधिकारी, ता. कर्जत, जि. रायगड.
१६) मा. उपविभागीय अधिकारी, ता. मावळ, जि. पुणे.
१७) मा. तहसिलदार, ता. मावळ, जि. पुणे
१८) मा. गट विकास अधिकारी, ता. मावळ, जि. पुणे.
१९) मा. उपविभागीय अधिकारी, ता. खालापूर, जि. रायगड.
२०) मा. तहसिलदार, ता. खालापूर, जि. रायगड.
२१) मा. गट विकास अधिकारी, ता. खालापूर, जि. रायगड.
२२) ग्रामपंचायत कार्यालय:- वडप, पोटल, पाली तर्फ कोथल खलाटी, हुमगाव, भिवपुरी, वैजनाथ, मांडवणे, सावळे-हेदवली, सावळे, कशेळे, मोगराज, भालिवडी, कडाव, बोरीवली, पाथ्रज, पिंपळोली, वाकस, नसरापूर, माणगाव, असल, चिंचवली, उकरूळ, उमरोली, वावळोली, किरवळी, हळवली, कर्जत शहर, पळसदरी, वेणगाव, तिवरे, वरई तर्फ नीड, गौरकामत, खांडपे, शिरसे, बीड बुद्रुक, कोंदिवडे, ता. कर्जत, जि. रायगड.
२३) ग्रामपंचायत कार्यालय:- बीड खुर्द, जांबरुंग, ता. खालापूर, जि. रायगड.
२४) ग्रामपंचायत कार्यालय:- उधेवाडी, खांडशी, शिरदे, खांड, डाहुली, कांब्रे ना.मा., कुसवली, उकसान, गोवित्री, मालेगाव बु., सावळा, ता. मावळ, जि. पुणे.

सही/-
उप प्रादेशिक अधिकारी रायगड-२



**भारत सरकार**
**वित्त व कंपनी कामकाज मंत्रालय**
**आर्थिक कामकाज विभाग (बँकिंग शाखा)**
**मुंबई कर्जवसुली न्यायाधिकरण क्र. १**
**एमटीएनएलभवन, २ रा मजला, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.**
**फॉर्म क्र. १६**
जप्तीचे वॉरन्ट
**वसुली प्रक्रिया क्र. १८०/२०२३**

पुढील दिनांक : २६.०८.२०२५
एक्झिबिट नं. ११

पंजाब नॅशनल बँक... प्रमाणपत्रधारक
विरुद्ध
अलियान्स सिक्युरिटी सोल्यूशन्स प्रा. लि. व अन्य...प्रमाणपत्र ऋणको
प्रति,

ज्याअर्थी तुम्ही प्रतिवादी यांनी पीठासीन अधिकारी, कर्जवसुली न्यायाधिकरण क्र. १ मुंबई यांच्याद्वारे जारी मूळ अर्ज क्र. २७५/२०१७ मधील वसुली प्रमाणपत्रानुसार तुमच्याद्वारे देय रक्कम **रु. १३,०५,९४,१७९.६२ (रु. तेरा कोटी पाच लाख चौऱ्याण्णव हजार एकशे एकोणऐंशी व बासष्ट पैसे मात्र)** अधिक त्यावरील व्याज व मूल्य या रकमेचे प्रदान करण्यात कसूर केली आहे.

वरील प्रकरणी अधोहस्ताक्षरितांद्वारे खालील निर्देशित मालमत्ता जप्त करण्यात आली असून त्यावर प्रभार निर्मित केले आहेत.

आदेश देण्यात येतआहे की, तुम्हाला याद्वारे अधोहस्ताक्षरितांची पुढील सूचना मिळेपर्यंत खालील निर्देशित मालमत्तांचे कोणत्याही स्वरूपात हस्तांतरण वा प्रभार निर्मित करण्यात प्रतिबंध करण्यात येत आहे तसेच सर्व व्यक्तींना याद्वारे असे हस्तांतरण वा प्रभारांअंतर्गत कोणतेही लाभ घेण्यापासून प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदर वॉरन्ट दि. २६.०८.२०२५ रोजी परत येण्याजोगी आहे.

**स्थावर मालमत्तेची अनुसूची**

१. पुढील विवरणीत कार्यालयाचा सर्व तो भाग व भूखंड - कार्यालय क्र. ४०१, ४ था मजला, वेलिंग्टन बिझनेस पार्क - १, अंधेरी कुर्ला मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई -४० ००५९, मोजमापित साधारण ६७० चौरस फूट. प्रमाणपत्र ऋणको क्र. ३ यांच्या मालकीची.

२. पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, सर्व्हेक्र. ५७, हिस्सा क्र. १ धारक, गाव कुंभिवली, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील, मोजमापित साधारण १.६९ हेक्टर. प्रमाणपत्र ऋणको क्र. ३ यांच्या मालकीची.

माझी सही व शिक्क्यानिशी दि. १० जुलै, २०२५ रोजी जारी

शिक्का

**(श्री. यतींदर कुमार सिन्हा)**
वसुली अधिकारी
डीआरटी -१ मुंबई

प्रत रवाना : फ्लॅटच्या संदर्भात आर. सी. हाऊसिंग सोसायटी नुसार सर्व प्रतिवादी
प्रत रवाना :

**१. अलियान्स सिक्युरिटी सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : काशिनाथ बिल्डिंग, १ ला मजला, १७, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ व ६, खैतान भवन, ६ वा मजला, १९८, जमशेदजी टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
**२. श्री. योगेश चड्डा**
फ्लॅट क्र. ७८, कल्पतरू पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड, डॉ. एस. एस. राव मार्ग, कल्पतरू हॅबिटट, बी विंग, परळ, मुंबई - ४० ००१२.
**३. श्रीमती मानसी हृषिकेश शाह**
२ रा मजला, अंजली अपार्टमेंट्स, गुलमोहर रोड, जेव्हीपीडी, जुहू विलेपार्ले (पश्चिम), मुंबई -४०००४९.
**४. श्री. हृषिकेश शाह**
२ रा मजला, अंजली अपार्टमेंट्स, गुलमोहर रोड, जेव्हीपीडी, जुहू विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-४०००४९.



### ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड-कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

**रोजगार सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (केआरसीएल) ने ट्रॅक मेंटेनर आणि पॉइंट्स मॅन पदे भरण्यासाठी **रोजगार सूचना क्रमांक सीओ/पी-आर/04/2025 दिनांक 04.07.2025** रोजी जारी केली आहे. ऑनलाइन नोंदणी आणि अर्ज करण्याची लिंक 25.07.2025 रोजी लाईव्ह करण्यात आली आहे. अर्ज प्रक्रिया फ्लो चार्ट केआरसीएल वेबसाइट **www.konkanrailway.com** वर उपलब्ध आहे.

**मुख्य कार्मिक अधिकारी**



### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे - ढाक, ता. कर्जत जि. रायगड, येथील जमीन मिळकतीचे मालक सौ. शुभदा नितीन ढवळीकर, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे - ढाक, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २७/१/ब | ४.९८.००<br>या एकूण क्षेत्रापैकी<br>शुभदा नितीन ढवळीकर, यांचे ताबेकब्जात व भोगवटासदरी नावे असलेले<br>०.६६.८४<br>पो.ख. ०.३१.१६<br>एकूण : ०.९८.०० इतके क्षेत्र | ०.३९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, २१ (एकवीस) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८



**ग्रुप ग्रामपंचायत जासई**
**मु.पो. जासई, ता. उरण, जि. रायगड**
**जाहिर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत जासई हद्दीतील विकास कामे खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधीतून करण्याकरीता विहीत मुदतीमध्ये ठेकेदारांकडून व मान्यता प्राप्त पुरवठा दाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | टेंडर फॉर्मची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जासई माऊली नगर तांडा वस्ती मध्ये संत सेवालाल बहुद्देशीय सार्वजनिक सभागृह बांधणे | बंजारा लमाण तांडा वस्तीता विकास | ७,००,०००/- | ७,०००/- | ५००/- | ६ महिने |
| २ | जासई माऊली नगर तांडा वस्ती येथील श्री. गणेश भालेकर (घर नंबर ९९६) यांच्या घरापासून ते श्री राम दत्तू मोरे (घर नंबर १४७१) यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे | बंजारा लमाण तांडा वस्तीता विकास | ३,००,०००/- | ३,०००/- | ५००/- | ६ महिने |

अटी व शर्ती
१. निविदा मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक ०२/०८/२०२५ ते ०८/०८/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकृत तसेच GST धारक ठेकेदार व पुरवठादार असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ११/०८/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

ठिकाण :- जासई
दिनांक :- ०२/०८/२०२५

**ग्रामपंचायत अधिकारी** — **ग्रुप ग्रामपंचायत जासई**
**सरपंच** — **ग्रुप ग्रामपंचायत जासई**



**ग्रामपंचायत कशेळे**
**ता.कर्जत, जि. रायगड**
**जाहीर निविदा सूचना**

कशेळे ग्रामपंचायत साठी सन २०२५-२६ या सालाकरीता ग्रामनिधी व १५ वा वित्त आयोग अंतर्गत कामे व साहित्य खरेदी करावयाची असल्याने मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून व पुरवठादाराकडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक ठेकेदार व पुरवठादार यांनी दि. ०४/०८/२०२५ ते दि. ११/०८/२०२५ पर्यंत विकास कामांचे निविदा सूचना मोहोरबंद पाकिटात संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावीत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा फॉर्म स्विकारण्याची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कशेळे येथे मठपती यांच्या घरापासून ते मुख्य रस्त्यापर्यंत गटार बांधकाम करणे. | २९९०००/- | दि. ०४/०८/२०२५ | दि. ११/०८/२०२५ | ग्रामनिधी |
| २ | मौजे कशेळे येथील स्मशानभूमी सुशोभिकरण करणे | २०००००/- | दि. ०४/०८/२०२५ | दि. ११/०८/२०२५ | ग्रामनिधी |
| ३ | मौजे कोठिंबे रामनगरवाडीत नळ कनेक्शन देणे | ५०७२१/- | दि. ०४/०८/२०२५ | दि. ११/०८/२०२५ | ग्रामनिधी |
| ४ | मौजे कशेळे बौद्धविहार रिलिंग व सुशोभिकरण करणे | ३०००००/- | दि. ०४/०८/२०२५ | दि. ११/०८/२०२५ | ग्रामनिधी |
| ५ | ग्रामपंचायत कार्यालयात संगणक खरेदी करणे | २ नग | दि. ०४/०८/२०२५ | दि. ११/०८/२०२५ | १५ वित्त आयोग |
| ६ | प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला वाटर फिल्टर पुरविणे | १ नग | दि. ०४/०८/२०२५ | दि. ११/०८/२०२५ | १५ वित्त आयोग |
| ७ | विद्युत पंप खरेदी करणे (५ HP) व साहित्य खरेदी करणे | १ नग | दि. ०४/०८/२०२५ | दि. ११/०८/२०२५ | १५ वित्त आयोग |
| ८ | अंगणवाड्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे | ८८३००/- | दि. ०४/०८/२०२५ | दि. ११/०८/२०२५ | १५ वित्त आयोग |
| ९ | वैयक्तिक कचराकुंड्या खरेदी करणे (५ लि.) | १०००००/- | दि. ०४/०८/२०२५ | दि. ११/०८/२०२५ | १५ वित्त आयोग |
| १० | अनु. जाती व जमाती महिलांना फास्टफूड प्रशिक्षण देणे. (३० प्रशिक्षणार्थी) | १०००००/- | दि. ०४/०८/२०२५ | दि. ११/०८/२०२५ | ग्रामनिधी |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-
१. वरील कामाच्या निविदा मोहोरबंद पाकिटात मा. प्रशासक ग्रामपंचायत कशेळे यांचे नावे दि. ११/०८/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.
२. ठेकेदार नोंदणीकृत व अनुभवी असावा व अर्जासोबत PAN व GST नंबर असणे आवश्यक आहे.
३. कोणतीही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दि. ११/०८/२०२५ रोजी सायंकाळी ठिक ४.०० वाजता मा. प्रशासक यांचे समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.
५. साहित्य उत्तम दर्जाचे आयएसआय/आयएसओ मार्क प्रमाणित असावे. गॅरंटी व वॉरंटी तपशील नमूद करावा.
६. कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% आयकर, १% विमा व २% GST ह्या रक्कमा परस्पर वजावट केल्या जातील.
७. विकास कामांचे अंदाजपत्रक तपशील ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

ठिकाण : कशेळे
दिनांक : ०१/०८/२०२५

**सही/-** **ग्रामपंचायत अधिकारी** **ग्रुप ग्रामपंचायत कशेळे** **ता. कर्जत. जि. रायगड**
**सही/-** **प्रशासक** **ग्रुप ग्रामपंचायत कशेळे** **ता. कर्जत, जि. रायगड**

# वैद्यकीय सहाय्यता निधीचा रुग्णांना आधार

## उपचारासाठी एक कोटी ९७ लाख रुपयांची मदत

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील २१९ रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधीचा आधार मिळाला आहे. वीस गंभीर आजारांवरील उपचारासाठी एक कोटी ९७ लाख तीन हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी कक्ष नवसंजीवनी ठरला आहे.

गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या रुग्णांवर महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, किंवा धर्मादाय रुग्णालयांच्या योजनांमाध्यमातून करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र गंभीर आजारावरील उपचाराचा खर्च अपेक्षेपेक्षा अधिक असल्याने गरीबांना उपचार करता, येत नाही. त्यासाठी रायगड जिल्ह्यात मख्यमंत्री सहाय्यता वैद्यकिय सहाय्यता कक्ष उभारण्यात आले आहे. पेपरलेस आणि डिजिटल प्रणालीद्वारे जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.त्यामुळे रुग्णांना मंत्रालयात जाण्याची गरज निर्माण होत नाही.



### अशा प्रकारे होते प्रक्रिया

आधार कार्ड, शिधापत्रिका, रूग्ण दाखल असल्यास त्याचा जिओ टॅग फोटो जोडणे बंधनकारक आहे. तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला (१.६० लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे) संबंधित आजाराचे वैद्यकिय रिपोर्ट जोडणे आवश्यक आहे. वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र, रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असावी. अपघातग्रस्त रूग्णांसाठी एफआयआर रिपोर्ट आवश्यक आहे. अवयव प्रत्यारोपण रूग्णांसाठी झेडटीसीसी नोंदणी पावती आवश्यक आहे.

- **दुर्बल घटकाला मदतीचा हात**
- **जिल्ह्याधिकारी कार्यालय कक्ष**

हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोनमॅरो प्रत्यारोपण, हाताचे प्रत्यारोपण, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग, अस्थिबंधन, नवजात शिशूंचे आजार, गुडघ्याचे प्रत्यारोपण, भाजलेले रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य देण्यासाठी हे कक्ष निर्माण केले आहे. वेगवेगळ्या गंभीर आजारावरील २१९ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहे. मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता कक्षामार्फत या रुग्णांना मदतीचा हात देण्यात आला आहे.

# ‘मॉकड्रिल’मुळे प्रवाशांचा खोळंबा

| उरण | वार्ताहर |

करंजा प्रवासी जेट्टीवर शुक्रवार (दि. १) ऑगस्ट रोजी सकाळी अचानक पोलीस यंत्रणांनी ‘मॉकड्रिल’मुळे प्रवाशांना तीन तास वेठीस धरले होते. सकाळी ९ वाजता दोन संशयित प्रवाशी रेवस येथील तरीमध्ये घुसल्याचा फोन आला. त्यानंतर सुरू झालेली पोलीस नाट्यमय कारवाई ती प्रवाशांच्या चांगलीच अंगलट आली. हवालदार सचिन पाटील यांना संशयितांची माहिती मिळताच उरण पोलीस ठाण्यात कळवण्यात आले. क्षणात यंत्रणा सज्ज झाली. उरण, मोरा, नवीमुंबई पोलीस, अग्निशमन दल, ॲम्ब्युलन्स, फॉरेन्सिक टीम, कुत्रा पथक, दुसऱ्या बोटीवरून फोर्स यांचे मोठे पथक घटनास्थळी धडकले. दोन संशयित बोटीमध्ये लपल्याचा नाट्यमय अंदाज गृहित धरून,



जेट्टीवर ताबा घेण्यात आला. संशयितांवर ‘खेल खतम’ करत प्रवाशांना ओलीस ठेवल्याचा नाटक संपले. आणि अचानक जाहीर झालेला हा मॉक ड्रिल होता. त्यामुळे सकाळी १० वाजल्यापासून दुपारी १ वाजेपर्यंत करंजा जेट्टीवर एकही बोट सोडली गेली नाही. न्यायालयात जाणारे, शासकीय कामासाठी धावणारे, घरची ओढ लागलेले महिला, वृद्ध, लहान मुलांचे हाल झाले. त्यामुळे प्रवाशांमध्ये संतापाचा उद्रेक झाला.

## वेधक

### शेकापच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण

**पनवेल :** शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापनदिन शनिवार (दि.२) ऑगस्ट पनवेल येथे साजरा होणार आहे. त्यानिमित्त शेकाप कार्यकर्ते विविध सामाजिक उपक्रम राबवित आहेत. शेकापचे पनवेल तालुका चिटणीस मंडळाचे सदस्य तथा व्यापारी सेलचे विभागीय अध्यक्ष संग्राम गोपी यांनी वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. भोपी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह पनवेल तालुक्यातील चिंचवण येथील महालक्ष्मी मंदिराच्या परिसरात विविध रोपांची लागवड केली. तसेच ही झाडे जगवण्याचा संकल्प देखील बोलून दाखवला आहे. यावेळी चिंचवण गावातील संजय पोपेटा यांच्यासह तरुणांची उपस्थिती होती.

### विद्यार्थ्यांकडून सीडबॉल टॉसिंग उपक्रम

**महाड :** मणिरी वेस्ट मॅनेजमेंट फाऊंडेशन आणि रायगड जिल्हा परिषद शाळा, टेमघर यांच्या सहकार्याने आमशेत येथे सीडबॉल टॉसिंग उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून रिठा आणि चिंचेच्या बिया जंगलात टाकून जैवविविधतेचे जतन करण्याचा आणि नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन करण्याचा संदेश देण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी एप्रिल महिन्यात संकलित केलेल्या बियांचे सीडबॉल तयार केले होते. आज त्यांचे वन विभागाच्या जागेत टॉसिंग करण्यात आले, जेणेकरून रिठा झाडांची वाढ होईल आणि भविष्यात नैसर्गिक साबणाचा वापर वाढवून जलप्रदूषण रोखता येईल. टेमघर शाळेतील ५३ विद्यार्थी, मुख्याध्यापक पोरे , शिंदे, ममता मेहता, डॉ. वैशाली बुटाला, शुभांगी हेरले, सुमानंद कुमार, रेश्मा, उज्वला कोळेकर, शारदा टक्के , पल्लवी सोनुले यांनी उपक्रमात सहभाग घेतला.

### वाहतूक पोलिसांची कारवाई

**अलिबाग :** वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील २८३ चालकांना वाहतूक पोलिसांनी दणका दिला आहे. त्यांच्याविरोधात कारवाई करीत त्यांच्याकडून दोन लाख ७६ हजार २०० रुपयांचा दंड वसूल करण्यात ाला आहे. रायगड जिल्ह्यातील जिल्हा वाहतूक शाखेच्या माध्यमातून अलिबाग पेण, अलिबाग - रोहा, अलिबाग - मुरूड- रेवदंडा. अलिबाग रेवस मांडवा मार्गावर ठिकठिकाणी वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले. हेल्मेट नसणे, वाहन वेगात चालविण, ज्यादा प्रवासी वाहतूक करणे अशा अनेक वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांविरोधात गुरुवारी (दि.३१) जुलै रोजी सकाळपासून संध्याकाळपर्यंत कारवाई केली. या कारवाईतून अनेकांविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# शहीद निलेश तुणतुणे यांना मानवंदना

| अलिबाग | प्रतिनिधी |

कारगिल युध्दात शहीद झालेले सहाणगोठी येथील निलेश तुणतुणे यांचा २७ वा स्मृतिदिन शुक्रवारी (दि.१) सहाणगोठी येथे साजरा करण्यात आला. यावेळी रायगड पोलिसांकडून तीन फेऱ्यांची सलामी देण्यात आली. माजी सैनिक, राजकिय, सामाजिक, शैक्षणिक व पोलीस विभागाकडून पुष्पचक्र, पुष्पहार अर्पण करून त्यांना मानवंदना देण्यात आली.

शहीद निलेश तुणतुणे ट्रस्ट व पंचायत समिती अलिबाग यांच्या संयुक्त विदयमाने हा समारंभ आयोजित केला होता.

यावेळी शहीद निलेश तुणतुणे यांची आई निर्मला तुणतुणे, वडील नारायण तुणतुणे, अलिबागच्या उपविभागीय पोलीस अधिकारी प्रतिक्षा खेतमाळीस, पोलीस निरीक्षक किशोर साळे, निवृत्त लष्कर अधिकारी कॅप्टन उमेश वाणी, सहाय्यक जिल्हा सैनिक अधिकारी ए. डी. शेख, राष्ट्रपती पदक पुरस्कर्ते तथा माजी सेना मेडल हवालदार शांताराम महाडीक, राजेंद्र म्हात्रे, अमर राणे, अनंत चवरकर, सरखेल कान्होजी आंग्रे माजी सैनिक संघटनाचे पदाधिकारी, सदस्य, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती अनिल पाटील, शहीद निलेश तुणतुणे ट्रस्टचे अध्यक्ष द्वारकानाथ नाईक, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, आक्षीच्या सरपंच रश्मी पाटील, बेलोशीचे माजी सरपंच कृष्णा भोपी, आदिवासी समाज कायदेशीर सल्लागार ॲड. के. डी. पाटील, विस्तार अधिकारी कृष्णा पिंगळा, गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, जिल्हा परिषदेचे शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ, महिला, तरुण, तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरुवातीला रायगड पोलीस व स्काऊड गाईडच्या वतीने संचलन करण्यात आले. यावेळी रायगड पोलिसांच्या वतीने बंदुकीच्या तीन फैऱ्या देऊन शहीद तुणतुणे यांना मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शहीद निलेश तुणतुणे यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. बोरपाडा जिल्हा परिषद शाळेसह खानाव शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांमधून नृत्याचे सादरीकरण केले. एक आगळ्या वेगळ्या उपक्रमातून हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळींनी शहीद तुणतुणे यांच्या कार्याची माहिती दिली.



● शहीद निलेश तुणतुणे यांचा स्मृतीदिन शुक्रवारी सहाणगोठी येथे झाला. यावेळी पोलीस निरीक्षक किशोर साळे, ट्रस्टचे अध्यक्ष द्वारकानाथ नाईक, पंचायत समितीचे माजी सभापती अनिल पाटील, सरपंच हर्षदा मयेकर, रश्मी पाटील, सेवानिवृत्त कॅप्टन उमेश वाणी, आदी उपस्थित होते.






















## भारतीय शेतकरी कामगार पक्ष

रायगड-अलिबाग

## वर्धापन दिन

दिनांक २ ऑगस्ट २०२५

**लाल सलाम**

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष सदस्यांचा मेळावा **शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०-०० वाजता सेक्टर नं.५/ए, गुरूद्वाराच्या बाजूला पोलीस ग्राऊंड, नवीन पनवेल येथे पक्षाचे सरचिटणीस मा.आमदार भाई जयंत पाटील** व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे. सदर मेळाव्यास पक्षाचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. तरी पक्ष कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला,
**सुरेश नामदेव खैरे**
जिल्हा चिटणीस
शे.का.प. रायगड-अलिबाग

# संशय होता, पुरावे नाहीत

मालेगाव इथे सप्टेंबर २००८ मध्ये झालेल्या बॉंबस्फोट प्रकरणातील सातही आरोपींची निर्दोष मुक्तता ही काहीशी अपेक्षितच होती. गेल्या सोळा वर्षांमध्ये या प्रकरणाने बरीच वळणे घेतली. आठ वर्षांपूर्वी तपास करणाऱ्या राष्ट्रीय यंत्रणेने म्हणजे एनआयएनेच या प्रकरणाच्या आरंभीच्या तपासात बराच गोंधळ झाला असा जाहीर ठपका ठेवला. तसेच या प्रकरणातील सरकारी वकिलांनाच कडक धोरण ठेवणे बंद करण्याची स्पष्ट सूचना एनआयएकडून करण्यात आली. मधल्या काळात, केंद्रात नरेंद्र मोदी व राज्यात देवेंद्र फडणवीस यांची सरकारे सत्तेत आलेली असल्याने हिंदू मंडळी दहशतवादात अडकलेली आहेत हे सिद्ध होणे अशक्य होईल हेही दिसत होतेच. गुरुवारी तेच झाले. विशेष न्यायालयाने ठोस पुराव्यांअभावी सर्व आरोपींची सुटका केली. या प्रकरणातील आरोपींबाबत जोरदार संशय असला तरी तो पुरावा ठरू शकत नाही असे म्हणून न्यायालयाने आपले कर्तव्य चोख पार पाडले आहे. अवघ्या दहा दिवसांपूर्वी मुंबईतील लोकलमध्ये झालेल्या साखळी बॉंबस्फोट प्रकरणामध्ये अटक केलेल्या मुस्लिम धर्मीय आरोपींचीही अशीच मुक्तता करण्यात आली होती. तेथे तर या सर्व आरोपींना विनाकारण गोवले गेले असावे असे दिसत होते. त्यापाठोपाठ हा दुसरा खटला सरकार हरले आहे. यात हिंदू आरोपींविरुध्द ठोस पुरावे देण्यात सरकारी पक्ष अयशस्वी ठरला. मालेगावच्या खटल्याकडे पूर्ण देशाचे लक्ष होते. २००४ मध्ये केंद्रातील वाजपेयींचे सरकार हरल्यानंतर देशात हिंदुराष्ट्र स्थापन करण्याची इच्छा बाळगणाऱ्यांनी गुप्त कारवाया सुरु केल्या. यासाठी अनेक संघटना स्थापन झाल्या त्यातले काही जण बॉंब बनवताना पकडले गेले. काहींवर समझोता एक्स्प्रेसमध्ये बॉंबस्फोट घडवल्याचे आरोप झाले. नंतर नरेंद्र दाभोलकर, कलबुर्गी इत्यादींच्या हत्येतही सनातनी संघटनांना आरोपी करण्यात आले. पण या सर्वांमध्ये मालेगाव बॉंब स्फोटाचे प्रकरण सर्वात मोठे होते. एक तर त्यात सहा जण ठार व शंभर जण जखमी झाले. शिवाय, मालेगावसारख्या शहरात ऐन रमझानच्या महिन्यात मशिदीच्या बाहेर हा स्फोट झाल्याने त्याचे गांभीर्य प्रचंड वाढले.

### खटला ढिला राहिला

या स्फोटानंतर आरंभी महाराष्ट्र पोलिसांनी काही मुस्लिम संशयितांना ताब्यात घेतले होते. पण नंतर पोलिसांच्या मते हिंदू संघटनांनी हा प्रकार केला असा पुरावा पुढे आला. त्यानुसार साध्वी म्हणवणारी ठाकूर प्रज्ञासिंग व इतरांना अटक झाली. एकातून दुसरे धागे उलगडत गेले. लष्करी अधिकारी लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांनी काश्मिरातून आरडीएक्स पैदा केले अशी शंका तयार झाली. पुरोहितने अभिनव भारत नावाची संघटना स्थापन केली होती. हिला आर्यावर्त नावाचे स्वतःचे हिंदूराष्ट्र स्थापन करायचे होते असेही तपासात पुढे आले. लष्करातील माजी मेजर रमेश उपाध्याय वगैरेंची नावे जोडली गेली. या लोकांच्या भोपाळ, फरिदाबाद अशा ठिकाणी बैठका झाल्या होत्या व हा अखिल भारतीय कट होता असे पोलिसांचे म्हणणे होते. महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथक अर्थात एटीएसने दिवंगत हेमंत करकरे यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू केला व प्रज्ञाला त्यांनी अटक केली होती. मात्र अवघ्या दोनच महिन्यात मुंबई हल्ल्यामध्ये ते मारले गेले. तिथून वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे हा तपास फिरत राहिला. हा तपास केला जाताना अनेक ढिल्या जागा ठेवल्या गेल्या असे निकालपत्रावरून दिसते. आरोपींचे फोन रेकॉर्ड करताना वा आवाजाचे नमुने गोळा करताना योग्य त्या परवानग्या न घेणे, लॅपटॉप त्वरीत सील न करणे इतक्या प्राथमिक चुका अधिकाऱ्यांनी केलेल्या दिसतात. सुधाकर चतुर्वेदी या आरोपीच्या लॅपटॉपमध्ये या सर्व आरोपींच्या बैठकीचे चित्रीकरण मिळाले. तो ठोस पुरावा होऊ शकला असता. पण हा लॅपटॉप अधिकाऱ्यांनी जप्त केल्यानंतर चोवीस तासांनंतर सील केला. त्यामुळे त्या तांत्रिक बचावाच्या आधारे हा महत्वाचा पुरावा निष्प्रभ ठरला. ज्या मोटारसायकलवर स्फोट झाला ती अत्यंत निर्णायक पुरावा होती. पण ती साध्वी प्रज्ञाच्या मालकीची होती हेही पोलिसांना सिध्द करता आले नाही. कारण त्यांनी गाडीच्या चासीवरचा नंबर मिळवण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले नाहीत. इतकेच काय स्फोट मोटारसायकलच्या आत ठेवलेल्या बॉंबमुळेच झाला हेही सिध्द होऊ शकले नाही. त्यामुळे मोटारसायकलवर कोणीतरी दुसऱ्याच माणसाने पार्सल ठेवले असू शकेल असा बचाव मान्य झाला.

### रहस्यमय घडामोडी

अर्थात पोलिसांची ही सर्व नाकामी दिसून येण्यात मूळ तपासातील हयगय किती व मोदींच्या राजवटीतील एनआयएने तपास हाती घेतल्यामुळे पुरावे कच्चे ठेवल्याचे झालेले प्रकार किती हे सांगणे कठीण आहे. त्यातही महाराष्ट्र एटीएसने हे प्रकरण नीट हाताळले नाही असे एनआयएचे म्हणणे होते. त्यामुळे त्यांनी ती जबाबदारी त्यांच्यावर टाकून आपले हात सोडवून घेतले आहेतच. आरंभी यामध्ये आरोपींवर मकोका लावण्यात आला. त्याबाबत बरीच कोर्टबाजी झाली. पण मोदींचे सरकार आल्यानंतर मकोका हटवण्याचा निर्णय झाला. मकोकाच्या तरतुदींनुसार आरोपींनी पोलिसांसमोर दिलेले जबाब हे खटल्यात कबुली म्हणून ग्राह्य मानले जातात. पण मकोका हटवल्यामुळे पुन्हा मॅजिस्ट्रेटसमोर जबाब घेतले गेले. त्यावेळी अर्थातच ते आरोपींनी फिरवले. पोलिसांच्या छळामुळे आपण माहिती दिली होती असे ते म्हणू लागले. अत्यंत महत्वाच्या साक्षीदारांबाबतही हेच झाले. एकूण ३२३ पैकी ३९ महत्वाचे साक्षीदार खटल्यादरम्यान उलटले. त्यांच्याविरुध्द शपथेवर खोटे बोलल्याचा वा पर्ज्युरीचा गुन्हा दाखल करावा ही काही वकिलांची मागणी एनआयएने मान्य केली नाही. त्यातच २०१६ मध्ये साक्षीपुराव्यांसंदर्भातील अत्यंत महत्वाची अशी कागदपत्रे रहस्यमय रीत्या चोरीला गेली. याचा तपास झाला नाही. ही कागदपत्रे ज्यांच्या ताब्यात होती त्यांना काहीही शिक्षा झाली नाही. त्यामुळे हा खटल्याचा निकाल आपल्या विरुध्दच लागावा यासाठी सरकार पक्षाकडूनच भरपूर प्रयत्न चालू होते असे एकूण चित्र होते. त्याला काल यश आले असे म्हणावे लागेल. या खटल्याच्या दरम्यान केंद्रातील चिदंबरम व सुशीलकुमार शिंदे या कॉंग्रेसच्या नेत्यांनी भगवा दहशतवाद असा शब्दप्रयोग केला. हिंदू संघटनांचा दहशतवाद असे त्यांना म्हणायचे होते. तोवर भाजपचे लोक सर्रासपणे, मुस्लिम दहशतवाद, हिरवे साप वगैरे शब्दप्रयोग खुलेपणाने करत आले होते. हे उल्लेख सरसकट सर्व मुस्लिमांना गुन्हेगार व अतिरेकी ठरवणारा होते. पण याच रीतीने जेव्हा हिंदूंचा उल्लेख कॉंग्रेसने केला तेव्हा मात्र भाजपने त्याला आक्षेप घेतला. मालेगाव किंवा समझोता एक्स्प्रेस हे कॉंग्रेसच्या मते कथित भगव्या दहशतवादाचे पुरावे होते. पण कॉंग्रेसी सरकारांचा नाकर्तेपणा असा आहे की ते याबाबतचे खटले भक्कमपणे लढवू उभे करू शकले नाहीत. सत्तेत असेपर्यंतच त्यांनी या खटल्यांमध्ये निर्णायक विजय मिळवला असता तर भाजप आज कदाचित सत्तेत नसती व असती तर वर तोंड करून बोलू शकली नसती.

**विचार**

# लाल बावट्याला सलाम

***शेतकरी कामगार पक्षाने अनेक नेते घडविले आणि त्या नेत्यांनी इतिहास घडविला. चरीचा संप असो किंवा कामगारांवरील अन्याय...शेकापने केवळ समाज परिवर्तनासाठी राजकारण केले. राजकारणात अर्थकारणाचा विचार न करता केवळ समाजकारणाला महत्व दिले. ज्याचा उल्लेख आजही जुने नेते आवर्जून करतात. शेकापच्या नेत्यांची पक्षाप्रती असलेल्या निष्ठेचा उल्लेख विरोधी पक्षनेतेही करतात. शेकापच्या एकनिष्ठ नेत्यांचे म्हणजेच अर्थात स्व. प्रा. एन.डी.पाटील, स्व.गणपतराव देशमुख, आ. जयंत पाटील, माजी राज्यमंत्री स्व. मिनाक्षी पाटील यांच्या कार्याला, त्यांच्या एकनिष्ठेला आजही संपूर्ण महाराष्ट्र सलाम करतो. हीच शेकापची खरी ताकद आणि ओळख आहे. राज्यासह देशाच्या हिताच्या निर्णयात शेकाप शिवाय पर्याय नाही, असे चित्र आजही दिसून येत आहे. डाव्या विचारसरणीचा लाल बावटा आज ७८ वर्षांचा झाला आहे. या संघर्षमय योध्द्याला लाल सलाम.***



शेकाप म्हटले की, स्व. गणपतराव देशमुख, स्व. एन.डी.पाटील तसेच भाई जयंत पाटील यांच्या घराची आठवण होते. सध्याचे राजकारण बघितले तर आठ-दहा वर्षात चार पक्ष फिरुन आलेला नेता दिसतो. मात्र प्रा. एन.डी.पाटील, स्व. गणपतराव देशमुख, आ. जयंत पाटील यांच्यासारखी सर्व जुनी नेतेमंडळी आयुष्यभर शेकापत राहीली. त्यांनी पक्ष बदलण्याचा विचारही कधी केला नाही. आजचा आमदार असेल तरी सकाळी उठून विचारावं लागतं की, आज कोणत्या पक्षात आहे? अशी परिस्थिती महाराष्ट्राच्या राजकारणात असताना शेकापच्या सर्व निष्ठावंत सैनिकांना, नेत्यांना सलाम. सत्ता नसतानाही पक्ष, मतदार आणि त्यांच्या तत्त्वांप्रती असलेल्या अखंड निष्ठेचे मनापासून कौतुक करावेसे वाटते.

बहुजन हिताय, बहुजन सुखाय, हे ब्रीद वाक्य कायम ठेवून अन्यायाविरोधात लढणारा पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्षाने आपली स्वतःची ओळख निर्माण केली आहे. सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी लढाई रस्त्यावरची असो अथवा विधी मंडळातील असो, शेकाप नेहमीच जनतेचा आवाज बनला आहे. लढवय्या पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्षाकडे पाहिले जाते.

सरकारच्या स्वार्थी धोरणामुळे गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी मातीमोल किमतीने घेतल्या जातात आणि नंतर त्यावर प्रचंड नफा कमविला जातो. आजवरची उदाहरणे पाहता, जिथे जिथे शेकापने जमीन संपादनाविरूद्ध आंदोलने केली, त्या त्या सर्व ठिकाणी एकतर संपादन रद्द झाले किंवा शेतकऱ्यांना वाजवीपेक्षा जास्त मोबदला मिळाला. त्यामुळे नवी मुंबईचे आंदोलन असो की न्हावा-शेवा पोर्टचे असो, सेझ नको म्हणून आंदोलन असो की आरसीएफविरुद्धचे आंदोलन असो, शेकापने मोर्चे, निदर्शने, घेरावसारखी आंदोलने केली, प्रसंगी जेल भोगले, लाठ्या खाल्ल्या आणि म्हणूनच स्थानिक शेतकऱ्यांना शेतीला भाव मिळाला, स्थानिकांना नोकऱ्या मिळाल्या. शेकापची आंदोलने नसती तर जमिनी मातीमोल किमतीने घेतल्या असत्या आणि शेतकरी व स्थानिक कुटुंबे बेघर झालीच असती व देशोधडीला लागली असती. शेकापचे समाजाप्रतीचे हे कार्य भावी पिढीने लक्षात ठेवलेच पाहिजे. देशाला स्वातंत्र्य मिळत असतानाच स्वातंत्र्यलढ्याचा नायक असलेल्या कॉंग्रेस पक्षातून बाहेर पडून कष्टकऱ्यांचा वेगळा शेतकरी कामगार पक्ष हा राजकीय पक्ष स्थापन होतो आणि राजकारण हलवून टाकण्याची आकांक्षा ठेवतो, हीच आज अविश्वसनीय वाटावी अशी गोष्ट आहे. पण ती घडली. कारण, हा पक्ष स्थापन करणाऱ्या लोकांकडे एक जबरदस्त आत्मविश्वास होता. त्यांना खात्री होती की आपल्याकडे एक अत्यंत शास्त्रशुद्ध विचारसरणी आहे. शिवाय या सर्वांची ध्येयवाद, कष्टकऱ्यांबद्दल असलेली निष्ठा आणि तळमळ बावनकशी होती. अशा नेत्यांनी पाया घातलेला असल्यानेच हा पक्ष आणि त्याचे कार्यकर्ते आजही सर्व वादळांना तोंड देत ठामपणे उभे आहेत. तत्कालिन सरकार ग्रामीण कष्टकऱ्यांची दुःख समजून घेण्यात अपुरे पडत होते. भारतीय राजकारणातील ही मोठी उणीव भरून काढण्याचे मूलभूत महत्त्वाचे काम शेतकरी कामगार पक्षाने केले. शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण कष्टकरी हा कोणत्याही व्यापक लढ्यांमधला प्रमुख सेनापती असायला हवा, हे तत्त्व शेकापनेच भारतीय राजकारणात सर्वप्रथम मांडले व आपल्या कामगिरीतून ते प्रस्थापितही केले. रायगड जिल्ह्यातील ना.ना. पाटील यांच्या नेतृत्वाखाली चरीतील शेतकऱ्यांच्या संपाने या भावी पक्षाच्या लढाऊपणाची पायाभरणी झाली. नंतर महाराष्ट्रभरातून अनेक दिग्गज नेत्यांनी ही जनतेची चळवळ पुढे नेली. काळानुरुप तिच्यात बदल झाले. पण, कष्टकऱ्यांप्रती असलेली तिची बांधिलकी यत्किंचतही कमी झाली नाही. राज्य विधिमंडळामध्ये सर्वाधिक विरोधी पक्षनेते याच पक्षाने दिले, ही बाब या संदर्भात बोलकी आहे. म्हणूनच, आजवर होऊन गेलेल्या मुख्यमंत्र्यांहूनही अधिक स्मरण विरोधी पक्षनेतेपदी राहिलेल्या शेकापच्या नेत्यांचे केले जाते. सामान्य माणसाचे प्रवक्ते ही भूमिका आजही या पक्षाने सोडलेली नाही. विकासाचा लाभ सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहोचवणे आणि दुसरीकडे विकासाच्या नावाखाली लादला जाणारा विनाश रोखणे, अशा दोन्ही आघाड्यांवर शेतकरी कामगार पक्षाने जी कामगिरी बजावली आहे, ती केवळ अद्वितीय अशा प्रकारची आहे. एकीकडे नवी मुंबईतील शेतकऱ्यांना साडेबारा टक्क्यांचा मिळवून दिलेला लाभ आणि दुसरीकडे रिलायन्ससारख्या सर्वभक्षक कंपनीचा रद्द झालेला सेझ ही याची दोन ठळक उदाहरणे आहेत. गणपतराव देशमुखांनी सांगोल्यात गेली पन्नास वर्षे जे काही केले, तोही याचाच वस्तुपाठ आहे. आज देशातील राजकीय आव्हानांचे स्वरुप बदललेले आहे. जातीयवाद आणि धर्मवादाने राजकारण विषारी बनले आहे. महागाई, बेकारी यासारखे प्रश्न दुय्यम ठरवले जात आहेत. लोकांनाही ध्येयवादी विचारसरणीपेक्षा व्यवहारवादी पक्ष अधिक आकर्षक वाटू लागले आहेत. पण, स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर स्वतःची नवी वाट चोखाळणारा शेकाप या नव्या भारतातल्या नव्या प्रश्नांचा तितक्याच ताकदीने सामना करू शकेल, यात शंका नाही.शेकापने नेहमीच अन्याय-अत्याचाराविरोधात आवाज उठवत वंचित-शोषितांचे असंख्य प्रश्न रस्त्यावर उतरुन सोडविले आहेत. आजतागायत जनतेच्या अडीअडचणीच्या काळात त्यांना साथ देण्यासाठी नेहमीच अग्रभागी राहिला आहे. म्हणूनच पक्षाची नाळ तळागाळातील सर्वसामान्यापर्यंत जुळली आहे. जेव्हा जेव्हा जनसमुदायांच्या मागण्यांना ठोस उत्तरे मिळाली नाहीत, तेव्हा सरकारच्या दारातच काय, रस्त्यावर येऊन ठाण मांडून आवाज उठविण्याचे कामही शेकापच्या कार्यकर्त्यांनी केले आहे. असे कित्येक प्रदीर्घ लढे शेकापने लढविले आहेत, त्या आंदोलनांचा इतिहासच साक्षीदार आहे.

आज पक्षातून काहीजण स्वार्थासाठी पक्ष सोडून, गेले तरी डाव्या विचारसरणीचा अस्सल कार्यकर्ता कधीही खचला नाही, नाउमेद झाला नाही. उलट, फिनिक्स पक्ष्याप्रमाणे तो अधिक जिद्दीने सक्रीय झाला. गावोगावचे असे असंख्य कार्यकर्ते ज्यांच्या निष्ठेवर, ज्यांच्या लढवय्येपणावर शेकाप उभा राहिला, लढला आणि जिंकला....कधी-कधी हरलाही. त्या सर्वांना लाल सलाम!शेतकरी कामगार पक्षाच्या आजच्या या ७८ व्या वर्धापनदिनी पक्षाच्या या सर्व जिद्दी, कट्टर शिलेदारांना लाल सलाम! सर्व छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांना, ज्यांनी गावोगावी लालबावटा पोचवला, अभिमानाने फडकवला, त्यांनाही लाल सलाम!शेकापच्या लाल बावट्याची आजन्म कास धरणाऱ्या प्रखर निष्ठावानांना लाल सलाम! लाल सलाम! लाल सलाम!!!

## शेतकरी कामगार पक्ष

शेतकरी कामगार पक्षाचा आज आहे
७८ वा वर्धापन दिन
कै. नाराण नागू पाटील
या ज्येष्ठ नेत्यांनी केला होता तो स्थापन
मा.श्री. जयंत पाटील साहेबांनी ठेवला
आहे तो महाराष्ट्रात मजबूत अजून
शे.का. पक्षाचा एक-एक कार्यकर्ता
अजून अन्यायाच्या विरूद्ध
आहे लढणारा
शेतकऱ्यांचे, कामगारांचे,
दिनदुबळ्यांचे प्रश्न सोडवणारा
तमाम जनतेचे काम करताना
ते हरपून जातात भान
एकेकाळी महाराष्ट्राचा विरोधी पक्ष पद
याच शे.का. पक्षाकडे होता
मा. आमदार कै. दत्ता पाटील साहेबांनी
तो यशस्वीपणे भूषविला होता
कित्येक नेते आहेत शे.का. पक्षात
अजून कर्तृत्ववान, बुद्धीमान
हा पक्ष आहे अन्यायाच्या विरूद्ध मोर्चे,
निदर्शने, रस्तारोका व उपोषण करणारा
सत्ताधाऱ्याच्या विरूद्ध आवाज उठवून
त्यांना सळो की पळो करून सोडणारा
मोठ्या जिद्दीने आज ही तो लढत आहे
हातात लाल बावटा घेऊन
नाही कुणापुढे तो वाकत की,
स्वःस्वार्थासाठी कुणापुढे ही नाही झुकत
कितीतरी स्थानिक स्वराज्य संस्था
अजून आहेत शे.का.
पक्षाच्याच ताब्यात
शेतकरी कामगार पक्ष हा महाराष्ट्र
राज्याची व मराठी माणसाची
वाढवित आहे शान
शे.का.पक्ष हा पुरोगामी विचारांचा
झुंझार लढवय्ये आहे पक्ष
त्यागातून, संघर्षातून, बळीदानातून
तयार झालेला हा आहे मोठा पक्ष
आहे या पक्षाला तुम्हा आम्हा सर्वांच्या
कामाची व कर्तव्याची जाण
शिक्षण क्षेत्रात ही शे.का. पक्षाने घेतली
आहे मोठी भरारी
लोककल्याणकारी कामासाठी, त्यांची
सदैव असते लढण्याची तयारी
शे.का.प हा महाराष्ट्रातील राजकीय
पक्षातला जसा आहे तो एक सोनेरी पान

**- कवी श्री. लवेंद्र मोकल, पेण**

**चर्चा आजची**

# अंमली पदार्थाचा तरुणाईला धोका



अंमली पदार्थाची विक्री, वाहतूक यापुर्वी मोठ्या शहरांमध्ये प्रचंड होत असतं. परंतु वाढते नागरिकीकरण, पर्यटनामुळे अंमली पदार्थाची विक्री, वाहतूक आता ग्रामीण भागातही सुरू झाली आहे. वेगवेगळ्या बंद कंपन्या-कारखान्यांचा वापर यासाठी केला जात आहे. गावांमध्ये ठिकठिकाणी या अंमली पदार्थांची विक्री होत आहे. अंमली पदार्थाची विक्री, वाहतूकीमुळे जिल्हयातील तरुणाईवर मोठे संकट येण्याची भिती निर्माण झाला आहे. अंमलदी पदार्थाचा तरुणाईला धोका संभवित असल्याचे चित्र आहे. त्यामुळे तरुणांनी याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये औद्योगिकीकरण व पर्यटन झपाट्याने वाढत आहे. वेगवेगळे लहान मोठे प्रकल्प उभे राहत आहेत. वेगवेगळ्या भागातून, राज्यातून कामगार कामानिमित्त जिल्ह्यामध्ये येऊ लागले आहेत.त्यामुळे नागरिकीकिकरण वेगात वाढत आहेत. जिल्ह्यात पर्यटन व्यवसायाला देखील गती येऊ लागली आहे. मात्र पर्यटकांच्या सोयीनुसार अनेक ठिकाणी सोयी सुविधा उपलब्ध केल्या जातात. वेगवेगळ्या भागातून आलेल्या काही तरुण पर्यटकांना गांजा, चरसचा वापर केल्याशिवाय पर्याय नसतो. हे पदार्थ ज्या ठिकाणी मिळतात, त्या परिसरात राहण्यावर ही मंडळी भर देतात. वेगवेगळ्या सुट्टीच्या दिवशी समुद्रकिनारी लहान मोठ्या खोल्या तयार करून त्यांना चरस, गांजा उपलब्धदेखील केला जातो. जिल्ह्यात काही ऐतिहासिक पर्यटन स्थळी महाविद्यालयीन तरुण एकत्र येतात.त्याठिकाणी गांजा व चरसचा आनंद घेण्यावर भर देतात. हा प्रकार खऱ्या अर्थाने निंदनीय आहे. रायगड जिल्ह्यामध्ये चरस, गांजा सारखे अंमली पदार्थ विक्री, वाहतूक केली जात आहे. दोनशे ते तीनशे रुपये पाकीट गांजा देऊन तरुणांना त्याची सवय लावली जात आहे. रायगड जिल्ह्यामध्ये अलिबागमध्ये गुटखा, विमल पान मसाल्याचा साठा सापडला. चार लाख १७ हजार रुपये किंमतीचा ऐवज पोलीसांनी जप्त केला. मुरूडमध्ये झालेल्या अंमली पदार्थ कारवाईत मुरूडमधील समुद्रकिनारी आयस्क्रीम व घोडेवाल्यामार्फत चरस, गांजाची विक्री होत असल्याचा प्रकार रायगड पोलिसांनी उघड केला. संबंधितांविरोधात कारवाई करण्यात आली होती. खालापूरमध्ये १६ किलो वजनाचा गांजा जप्त करण्यात आला होता. चार लाख रुपये किंमतीचा ऐवज ताब्यात घेतला होता. महाडमधील एमआयडीसी भागातील

**प्रमोद जाधव**

रोहन केमिकल्स प्रा. लि. कंपनीमध्ये बेकायदेशीररित्या केटामाईन अंमली पदार्थ तयार केला जात होता. रायगड पोलिसांनी छापा टाकून ८८ कोटी ९२ लाख रुपयांचा साठा जप्त केला.

जिल्ह्यातील विविध भागात अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांविरोधात रायगड पोलिसांमार्फत कारवाई सुरू केली आहे. या कारवाईतून करोडो रुपयांचा अंमली पदार्थ जप्त केला जात आहे. या कारवाईने अंमली पदार्थाची विक्री, वाहतूक करणाऱ्यांना दणका मिळाला आहे.

अंमलीपदार्थांचीतस्करीकरणाऱ्याविरोधात कारवाई करण्यापासून तरुणाई अंमली पदार्थाच्या आहारी जाऊ नये, म्हणून पोलिसांमार्फत शाळा, महाविद्यालयात वेगवेगळे शिबीर घेतले जात आहेत. जनजागृतीपर उपक्रम राबवून अंमली पदार्थाच्या सेवनाचे तोटे व शरीरावर तसेच मानसिक परिणाम होण्याबाबात माहिती देण्याचे काम केले जात आहे. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस त्यांचे काम करीत आहेत. अंमली पदार्थांचे सेवन रोखण्यासाठी पालकांचीदेखील महत्वाची भुमिका आहे. पालकांनी मुलांसोबत संवाद, चर्चा करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. मुलांचे वर्तन आणि मित्रांबद्दल जागरुकता असणे आवश्यक आहे. घरामध्ये मुलांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे. बाहेरील दुनियेतील चुकीच्या वागण्याचे परिणाम याची जाणीव करून देणे आवश्यक आहे. अंमली पदार्थाचे व्यसन टाळण्यासाठी नियमीत व्यायामाबरोबरच संतुलित आहार होणे आवश्यक आहे. निरोगी संतूलन जीवन जगण्याचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे. ताणतणावातून मुक्ती मिळाल्यास अंमली पदार्थाच्या आहारी जाण्याच्या मार्गाला रोखता येणार आहे. अंमली पदार्थ सेवन करण्यापासून रोखण्यासाठी जागरुकता आणि शिक्षण हा महत्वाचा भाग आहे. शाळा महाविद्यालयात अंमली पदार्थाच्या गैरवापराचे धोके, आरोग्यावर व मानसिक होणारा त्रास याची जाणीव करून देण्यासाठी शाळा महाविद्यालयात वेगवेगळे उपक्रम राबविले गरजेचे आहे. उज्ज्वल भविष्यासाठी तरुणांना चरस, गांजा, गुटखा अशा अनेक अंमली पदार्थापासून दूर ठेवणे कठीण आहे. ही प्रक्रीया कठीण असली, तरीदेखील पुरेशी जागरूकता,कायद्याची अंमलबजावणी यांचा समावेश बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे.

**लोकसंसद**

## खरे मित्रप्रेम त्यागात !

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी राष्ट्रीय मैत्री दिन देशभरात साजरा केला जातो. भारतात बहुतांश शाळा महाविद्यालये, कार्यालये यांना रविवारी सुट्टी असल्याने हा दिवस आदल्या दिवशी शनिवारी किंवा दुसऱ्या दिवशी सोमवारी साजरा केला जातो. दरवर्षी भारतात उत्साहाने साजरा करण्यात येणाऱ्या 'फ्रेंडशिप डे'ला तसा कोणताही ऐतिहासिक आधार नाही. पेरुग्वेमध्ये सुरु झालेला हा मैत्री दिन आज भारतातील गल्लीपासून दिल्लीपर्यंत पोहोचला आहे. अमेरिकेत १९३५ मध्ये ऑगस्टच्या पहिल्या रविवारी एका व्यक्तीची हत्या करण्यात आली होती. खून झालेल्या व्यक्तीच्या जवळच्या मित्राला ही घटना कळताच त्यानेही निराशेने आत्महत्या केली. मित्रांमधील हे प्रेम पाहून अमेरिकन सरकारने ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी फ्रेंडशिप डे साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर भारतासह इतर देशांमध्ये ऑगस्टच्या पहिल्या रविवारी फ्रेंडशिप डे साजरा केला जाऊ लागला. शालेय आणि महाविद्यालयीन तरुणांमध्ये या दिवसाची विशेष क्रेझ असते. हल्ली सर्वांच्याच हातात स्मार्टफोन आणि त्यात अनलिमिटेड इंटरनेट डाटा आल्याने सोशल मीडियावर या विदेशी दिवसांचे भलतेच पेव फुटले आहे. जीवनात एकतरी मित्र असावा ज्याच्याशी आपले सुख दुःख व्यक्त करता येईल, आपल्या भाव भावना, मनातील विचार त्याच्यासमोर प्रकट करता येतील, कठीण काळात तो आपला आधार बनून आपल्यासोबत उभा राहील. प्रसंगी आपल्याला योग्य सल्ला देईल आणि आपल्याकडून चूक झाल्यास ती परखडपणे आपल्याला सांगेल. आजमितीला स्मार्ट फोनच्या दुनियेत मैत्रीच्या व्याख्या बदलू लागल्या आहेत. फेसबुकवर आणि इंस्टाग्रामवर हजारोंच्या संख्येने मित्र आणि फॉलोअर्स असणे याला मैत्री म्हणावे का? मित्रत्वाचे नाते केवळ मनगटावर रिबिनी बांधून, पेनाने नावे लिहून आणि सोशल मीडियावर शुभेच्छा देऊन व्यक्त करता येत नाही. त्यामागे असावी लागते ती त्यागाची भावना. कुठूनतरी परदेशातून आलेले फॅड चालवून एक दिवस आपले मित्रप्रेम सार्वजनिकरित्या प्रकट करण्याऐवजी या देशाच्या मातीत घडून गेलेल्या अपार मित्रप्रेमाच्या आणि त्यासाठी केलेल्या त्यागाच्या कथा आज शाळा महाविद्यालयांतून विद्यार्थी मनावर बिंबवायला हव्यात. सुदामासाठी आपले सारे वैभव लुटवू पाहणारा श्रीकृष्ण, शिवरायांच्या हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या लढ्यात प्राणाची बाजी लावून लढलेले सवंगडी मावळे, संभाजी महाराजांची शेवटच्या श्वासापर्यंत साथ न सोडणारे मित्र कवि कलश अशी एक ना अनेक उदाहरणे या भारतभूमीत घडली आहेत. ज्यांच्या मित्रप्रेमाच्या कथा आजही प्रेरणादायी आहेत. या कथा आणि त्यामागील त्यागाची भावना आजच्या पिढीमध्ये रुजवायला हवी म्हणजे मित्रप्रेम हे एक दिवसापुरते सीमित नसते हे त्यांनाही कळेल.

**- जगन घाणेकर, घाटकोपर**

**दिनविशेष**

# शेकापने जपली ७८ वर्षाची परंपरा

२ ऑगस्ट- शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन. बघता बघता ७८ वर्षे झाली शेकापच्या स्थापनेला. या पक्षाने अनेक चढउतारही अनुभवले. पण सर्वसामान्य, शेतकरी, कष्टकरी, गोरगरीब जनतेशी असलेली नाळ मात्र काही तुटू दिली नाही. आजही जिथे-जिथे सर्वसामान्यांवर अन्याय होतो, शेतकऱ्यांची पिळवणूक होते त्या ठिकाणी शेकापने आवाज उठविल्याचे दिसून येते. आतापर्यंत चार पिढ्यांनी आपल्या परीने शेकापचा लालबावटा खांद्यावर घेऊन शेकापला उभारी देण्याचे काम केले. आता पाचवी पिढीही समर्थपणे आपल्या पूर्वजांनी खांद्यावर घेतलेला लालबावटा मोठ्या अभिमानाने घेऊन मिरवित आहे.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतीय राजकारणामध्ये शेकापची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. महाराष्ट्रामध्ये या पक्षाला विशेष स्थान आहे. विशेषतः रायगड जिल्ह्यामध्ये आजही हा पक्ष प्रबळ ठरला आहे. शेतकरी व कामगार यांचे हित जोपासणारा विचार मांडणारा, योजना सुचविणारा असा एक गट सन १९४७ मध्ये बहुजन समाजातील नेत्यांनी कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघ या नावाने काढला. अखिल भारतीय कॉंग्रेस समितीने १९४८ मध्ये आपल्या घटनेत दुरुस्ती करून कॉंग्रेस अंतर्गत स्वतंत्र घटना व कार्यक्रम असलेले पक्ष, गट अस्तित्वात असणार नाहीत असे जाहीर केले. त्यामुळे शेतकरी कामगार संघाच्या नेत्यांनी त्याच वर्षी कॉंग्रेसपासून वेगळे होऊन शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. रायगडमध्ये या पक्षाचा प्रभाव सुरुवातीपासूनच होता आणि तो आजही टिकून आहे. शेतकऱ्यांचे नेते नारायण नागू पाटील, भाऊसाहेब राऊत यांनी स्थापन केलेल्या शेकापची धुरा पुढे स्व. ॲड. दत्ता पाटील, स्व. दि.बा. पाटील, रायगड जि.प.चे माजी अध्यक्ष स्व.प्रभाकर पाटील, दत्तुशेठ पाटील या पिढीने सांभाळली. त्यानंतरच्या कालखंडात स्व. मोहन पाटील, स्व. मीनाक्षी पाटील, मा. आ. जयंत पाटील, नाना सावंत, के.आर. मुंढे, ग.स.कातकर, पा.रा. सानप, वसंत राऊत, सुमंत राऊत, विवेक पाटील, बाळाराम पाटील, अ.प.शेटे, अशी एक साखळीच निर्माण झाली. त्यांच्या नेतृत्वातील रायगड जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाने जी वाटचाल केली ती विशेष आहे. त्यामुळेच आजही या पक्षाचा प्रभाव रायगड जिल्ह्यावर राहिलेला दिसून येतो. आता पक्षाची पाचवी पिढी समर्थपणे पक्षाचे नेतृत्व करीत आहे.

शेतकरी कामगार पक्षाची प्रारंभीची वाटचाल पाहता १९४८ मध्ये पेण मुक्कामी पक्षाचे नेते काकासाहेब वाघ व नाना पाटील आणि नारायण नागू पाटील यांची भेट होऊन त्या चर्चेनुसार वडखळ, पोयनाड येथे पक्षाच्या वतीने सभा भरल्या. या सभेला शेतकऱ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. यावेळी कुलाबा विभागाचे नेतृत्व नारायण नागू पाटील यांच्याकडे होते. त्यांनी आपल्या परीने पक्षाच्या विकासासाठी प्रयत्न केले. स्व.नारायण नागू पाटील जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष असताना त्यांनी निःस्वार्थीपणे कार्य केले. सन १९५१ -५२ च्या निवडणुकीमध्ये अलिबाग तालुक्यामधून ना. ना. पाटील यांची उमेदवार म्हणून नेमणूक झाली. मुंबई राज्यात पक्षाला १७ जागा मिळाल्या. यामध्ये कुलाबामध्ये पक्षाचा प्रभाव जास्त होता. पक्षाचे एक ज्येष्ठ नेते म्हणून ना.ना. पाटील यांनी सन १९५९ मध्ये पेण तालुक्यातील ठाकूर, कातकरी आदिवासीची जाहीर सभा भरलेली असताना त्याचे अध्यक्षपद भूषवले व आमदार गो. स. कातकरी यांनी आदिवासींच्या मांडलेल्या ११ मागण्यांना पाठिंबा दिला. तसेच आपल्या भाषणांमध्ये आदिवासींना मार्गदर्शन केले. तसेच जनतेचे प्रश्न आपल्या कृषीवल या साप्ताहिकातून सातत्याने मांडून सरकारपर्यंत ते प्रश्न पोचविण्याचे कार्य कायम केलेले दिसून येते. १९५७ मध्ये लोकप्रतिनिधी म्हणून ॲड. दत्ता पाटील विधानसभेत पोहचले. एक कुशल संसदपटू म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला. त्यांचे कार्य केवळ रायगडपुरते न राहता महाराष्ट्रभर पोहोचले. आर्थिक विकासाच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यात सहकाराची पायाभरणी केली. त्यांची वकिली ही पैसा कमवण्याचे साधन न बनता गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी होती.

# कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद) - मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

बेचरभाई मनसी गाला, वाढदिवस, ठाणे



डॉ. श्री. संजीव चन्नापा शेटकर, वाढदिवस, अलिबाग




स्व. रोहन गेडाम, स्मरणार्थ विद्यानगर अलिबाग



प्रियदर्शिनी मेहुल पाटील, ३ रा वाढदिवस अलिबाग

## बोध



समाजातील सर्व साधुसंतांनी कणखरनिष्ठेने आणि भगवंतावरील मनापासून प्रेमाने देवाचा साक्षात्कार करून घेतला आहे. ते देवाचे झाले आहेत आणि देव त्यांचा झालेला आहे. त्यांनाही कोणत्याही सुखाची लालसा नसते. ते जगात नांदतात ते जगाच्या सुखाकरिता. मानवांना सुखाचा मार्ग दाखवावा म्हणून ते तळमळत असतात. आणि प्रचंड कार्य करतात. प्रत्येक साधूला भगवत स्पर्श असतो. भगवंत दर्शन असते. त्यांना भगवंताची जी प्रचिती आली ती जशीच्या तशी ते सांगत असतात. म्हणून त्यांच्या कितीही मतभेद असले तरीही ते सर्वच देवाचे असतात. आणि अनुभवातून बोलतात. म्हणून खरे खोटे बरोबर चूक असे त्यात काही नसते. कोणाही सत्पुरुषांच्या पावलावर पाऊल टाकून चालावे आणि स्वतःचे हित करून घ्यावे.

**श्री ज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर सूचना

आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत गाव विहूर, तालुका मुरुड, जिल्हा रायगड, महाराष्ट्र, येथील मुरूड ग्रामपंचायत यांच्या कार्यकक्षेतील श्री. निनाद जगन्नाथ परदेशी यांच्या नावे असलेल्या सर्व्हे क्र. ३१२ धारक अंदाजे ११ हेक्टर व ७६ आर क्षेत्रफळाच्या जमिनीच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणाही व्यक्तीचा सदर जागेसंदर्भात उत्तराधिकार, हिस्सा, विक्री, गहाण, भाडेकरार, अनुज्ञप्ती, भेट, ताबा, मूळ हक्क करारांचा ताबा वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा वा हक्क असल्यास त्यांनी अधोहस्ताक्षरितांना त्यासंदर्भात सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत असे दावे, काही असल्यास, सहाय्यक दस्तावेजांसमवेत सादर करावेत अन्यथा अशा व्यक्तींचे असे दावे काही असल्यास ते अधित्यागित समजले जातील.

**मालमत्तेची अनुसूची**

जमीन विवरण सर्व्हे क्र. ३१२, मोजमापित अंदाजे ११ हेक्टर व ७६ आर, गाव विहूर, तालुका मुरुड, जिल्हा रायगड, महाराष्ट्र, मुरूड ग्रामपंचायत यांच्या कार्यकक्षेतील.

दि. ३१.०७.२०२५

मुल्ला ॲन्ड मुल्ला ॲन्ड क्रेग ब्लन्ट ॲन्ड कॅरो
सही/-
होमीयर एन. वकील
भागीदार
संभाव्य गहाणवटदारांचे वकील
मुल्ला हाऊस, ५१, एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई -४०००01.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे देवघर ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालिल वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या पक्षकारांस संमती दिली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | ग. नं./हि. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे देवघर ता. अलिबाग जि. रायगड | २२५ | ०२.५४.८० पो. ख. ००.४२.७० एकुण ०२.९७.५० | ५८.३१ |

(वरील मिळकतीपैकी त्या मिळकतीच्या विद्यमान मालक सौ. स्वाती अनिल म्हात्रे यांचे सामाईक हिश्श्याचे क्षेत्र ०१.४७.५० हे. आर. क्षेत्रापैकी श्रीमती. स्वाती अनिल म्हात्रे यांचा असणारा १/३ इतका अविभक्त क्षेत्र)

सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी वरील मिळकत निर्वेध असल्याबाबत हवाला दिला आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, दान गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र व पुराव्यासहीत सादर करावा.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक ०२/०८/२०२५

सही/-
**ॲड. अभिषेक महेश पिसाट**
१७ अलिबाग कमर्शिल कॉम्प्लेक्स, बिग स्प्लॅश हॉटेल शेजारी अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड
मो. ९५९५०३२३२०

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. २०६/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. पांडुरंग बळीराम कोरपे
वय ४८ वर्षे, धंदा : शेती,
सध्याचा पत्ता :- सुरत, गुजरात — अर्जदार
कायमचा पत्ता :- रा. येरद,
ता. माणगांव, जि. रायगड

विरूद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत कडापे, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. पांडुरंग बळीराम कोरपे यांचे वडील कै. बळीराम पांडुरंग कोरपे हे दि. १६/०७/१९९१ रोजी मौजे येरद, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०३/०७/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे वडील कै. बळीराम पांडुरंग कोरपे हे दि. १६/०७/१९९१ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. पांडुरंग बळीराम कोरपे यांचे वडील कै. बळीराम पांडुरंग कोरपे हे दि. १६/०७/१९९१ रोजी मौजे येरद, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव :
ता. : ३१/०७/२०२५

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगाव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वयाळ, ता.खालापूर, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक यमुना नामदेव भोपी वै ५ यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे वयाळ, ता. खालापूर, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६ | ५ | ०-१४-९० | ०-६९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०२/०८/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत तिचे मालक श्री. मोरेश्वर बाजी उर्फ बाजीराव जोशी, रा.श्री. समर्थ अपार्टमेंट, पहिला मजला मराठी शाळा नं. १ समोर कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ३८ | ३ | ०-९६-०० | ०=७७ |
| ३८ | ४ | १-३७-२० | १=३७ |
| ३८ | ५/ब | ०-९१-०० | ०=८४ |
| ३८ | ७ | १-००-०० | ०=६९ |
| ३८ | ८ | ०-५०-०० | ०=४५ |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २/८/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस.एल.एल.बी.
प्रभात अपार्टमेंट, रूम नं. ४, दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे कुर्डुस, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. चंद्रकांत हिरु बेन्सेकर, रा. स्पिंग व्हॅलीजवळ, प्लॉट नं. १३, बिल्डींग नं. २, साईपूर्ती को. ऑप. हौ. सोसायटी, साई शिवनगर, नाशिक द्वारका, नाशिक व मु. कुर्डुस, दत्तवाडी, पो. कुर्डुस, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| कुर्डुस | ३५९ | | ०-५५-२० | ४.३१ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-१२-३० | |
| | | एकूण | ०-६७-५० | |

वर नमूद मिळकतीपैकी ०-५०-०० हे. आर. मिळकती संदर्भात.

सबब सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठे करार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/०८/२०२५

सही/-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुनिल गोविंद घाग रा. मिठेखार, यांचेकडून सदर खालील वर्णनाची जमीन मिळकती पैकी त्यांच्या हिस्स्याची १/२ इतकी जमीन आमचे अशिलांनी कायम स्वरूपी खरेदी-विक्री घेण्याचे ठरविले आहे.

**गाव चेहेर येथील मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे. आर | आकारणी रू.पै | लागवड |
|---|---|---|---|---|
| चेहेर | २७/२ | ०.३७.९५ | ५.२६ | भात |

वर वर्णन एकुण क्षेत्रापैकी ०.१८.९ इतका क्षेत्र हा या साठेकराराचा विषय आहे.

वरील नमुद मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा करून घेण्याकरीता सदरची नोटीस देण्यात येत आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहान दान, लिज, फरोक्त, भागीदार, बक्षिस, मृत्यूपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी, हक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत लेखी स्वरूपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी या मुदतीमध्ये कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे अशिल खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कागदोपत्री पुरावा न जोडलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : चेहेर
दिनांक : ०१/०८/२०२५

सही/-
**ॲड. सचिन दत्तात्रेय पाटील**
मु. येसदे, पो. वळके, ता. मुरूड, जि. रायगड.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या वतीने आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत गाव सातघर व पेंढांबे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील संबंधित जमिनींच्या भूखंडांसंदर्भात (यापुढे एकत्रितरीत्या जमिनी म्हणून उल्लेखित) जमीनमालकांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहोत ज्यांनी आम्हाला असे सूचित केले आहे की, ते जमिनींचा भाग बनत असलेल्या संबंधित जमिनींच्या भूखंडाचे संपूर्ण मालक आहेत तसेच सदर जमिनी या कोणत्याही प्रकारच्या सर्व भारांपासून मुक्त आहेत. आमचे अशील हे सदर जमीनमालकांकडून जमिनींची खरेदी करू इच्छित आहेत.

कोणीही वा सर्व व्यक्तींचा जमिनी वा त्यांचे कोणतेही भाग वा कोणतेही एफएसआय वा संभाव्य विकास यांमध्ये उत्तराधिकार, विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांकन, हिस्सा, गहाण, प्रभार, कर्जे, आगाऊ रकमा, विमोचन, परित्याग, भाडेकरार, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, देखभाल तत्त्वावर, धारणाधिकार, इच्छापत्र, अभिहस्तांकन, वहिवाट, भेट, विनिमय, भार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कर्ज तडजोड, इच्छापत्र, मृत्यूपश्चात वारसा, वारसा, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, ताबा, कब्जा, कोणतेही विधि न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल वा वैधानिक प्राधिकारी वा लवाद यांचा निवाडा, आदेश वा हुकूम, कंत्राटे/करार/विक्री करार, अभिहस्तांकन, करार, सामंजस्य करार, हेतूपत्र/टर्म शीट/हेड ऑफ टर्म, विकास/संयुक्त विकास हक्क, भागीदारी, हक्क मार्ग, विचाराधीन विवाद, आरक्षण, मुखत्यारपत्र, मत, प्रथम नकाराधिकार, पूर्व क्रय अधिकार वा कोणतेही दायित्व वा कोणतेही वचनबद्धता वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, दावा, लाभ, हितसंबंध, मागणी, विवाद, शंका, हिस्सा वा संपत्ता वा कोणताही अविभाजित हक्क, अधिकार, हिस्सा वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात खालील निर्देशित पत्त्यावर अधोहस्ताक्षरितांना त्यांच्याद्वारे करण्यात येत असलेल्या वा निहित असे दावे, मागण्या वा हक्क ज्याआधारावर असतील तशा सर्व दस्तावेजांचय प्रतींसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा असे सर्व हक्क, दावे, मागण्या, हिस्से, संपत्ती, लाभ व/वा हितसंबंध हे अधित्यागित समजण्यात येतील व आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील जे अशा त्यांच्या कोणत्याही संदर्भाविना/अडथळ्याविना जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया करतील.

**वरील संदर्भित अनुसूची**
**(जमिनींचे विवरण)**

| गाव | नवीन सर्व्हे क्र. | क्षेत्र (आर मध्ये) | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| सातघर | ७ | ३३.७ | १. जैनब्बीबी उस्मान कुरेशी, २. सुलेमान अब्दुल्ला कुरेशी, ३.मुमताज मोहिद्दीन कुरेशी, ४.राजू मोहिद्दीन कुरेशी, ५. निजाम मोहिद्दीन कुरेशी, ६. फरीदा याशीन शेख, ७. सकिना इसाफ पानसरे, ८. रुबिना वसीम कलाबास्कर, ९. आशिया ताजहमद बोरोंडकर, १०. बिल्किस अन्वर कुरेशी, ११.अरमान अन्वर कुरेशी, १२.अनीश अन्वर कुरेशी, १३. आलिया मंजूर खान, १४. अलिसा रियाझ अन्वरे, १५.बानू शागीर मुल्ला, १६. फेमिदा नझीम शाह, १७. फातिमा आदम कुरेशी, १८. मीनुद्दीन आदम कुरेशी, १९.हनीफा हमीद औसेकर, २०. निगार सुलताना आदम कुरेशी, २१. सलीम आदम कुरेशी, २२. रफिक आदम कुरेशी, २३. अख्तरी आदम कुरेशी, २४. मुजीबुल्ला आदम कुरेशी, २५. मुनावर आदम कुरेशी व २६. अब्दुलफत्ता आदम कुरेशी. |
| | १० | ११.४ | १.जैनब्बीबी उस्मान कुरेशी, २.सुलेमान अब्दुल्ला कुरेशी, ३. मुमताज मोहिद्दीन कुरेशी, ४. राजू मोहिद्दीन कुरेशी, ५.निजाम मोहिद्दीन कुरेशी, ६.फरीदा याशीन शेख, ७. सकिना इसाफ पानसरे, ८.रुबिना वसीम कलाबास्कर, ९. आशिया ताजहमद बोरोंडकर, १०. बिल्किस अन्वर कुरेशी, ११.अरमान अन्वर कुरेशी, १२. अनीश अन्वर कुरेशी, १३. आलिया मंजूर खान, १४.अलिसा रियाझ अन्वरे, १५.बानू शागीरमुल्ला, १६.फेमिदा नझीम शाह, १७.फातिमा आदम कुरेशी, १८. मीनुद्दीन आदम कुरेशी, १९.हनीफा हमीद औसेकर, २०.निगार सुलताना आदम कुरेशी, २१.सलीम आदम कुरेशी, २२.रफिक आदम कुरेशी, २३.अख्तारी आदम कुरेशी, २४. मुजीबुल्ला आदम कुरेशी, २५.मुनावर आदम कुरेशी व २६.अब्दुलफत्ता आदम कुरेशी |
| | १२ | ३० | इब्राहिम हुसेन कुरेशी |
| | १५ | १७.५ | १ए)रणजित रामचंद्र पाटील व १ बी श्रद्धा रणजीत पाटील. |
| | २०. | २. | समीर दीनानाथ पाटील |
| | ७७/२ | २० | १. चित्रा मारुती पाटील ९ मयत असल्याने त्यांच्या कायदेशीर वारसांच्या माध्यमातून - १ ए) समाधान मारुती पाटील व १ बी) दर्शन मारुती पाटील. २. समाधान मारूती पाटील व ३. दर्शन मारुती पाटील. |
| पेढांबे | १७० | ३५.२ | बाळकृष्ण श्रीकृष्ण पाटील |
| | १७३ | २५.९ | रझीयाबेगम हुसेनमियां चापेकर |
| | १८६ | ४१ | १. झैनाब्बेगम हसनखान घोरी, २. असीफ हसनखान घोरी, ३. अश्रफ हसनखान घोरी व ४. अतीक हसनखान घोरी. |
| | १८७ | ४३.५ | १. अब्बास अमझदअली सय्यद व २. कासम अली अमझद अली सय्यद. |
| | १९३ | ३९.५ | १. नितीन अनंत पाटील व २. संदीप अनंत पाटील. |
| | २२६ | ३५.१ | १. अब्बास अमझदअली सय्यद व २. कासम अली अमझदअली सय्यद. |
| | एकूण क्षेत्र | ३५२.८ आर | |

दिनांक : ०२ ऑगस्ट, २०२५

**कु. अनुजा केडिया**
वरिष्ठ भागीदार
मेसर्स परिणम लॉ असोसिएट्स
१३ वा मजला, एक्सप्रेस टॉवर्स, रामनाथ गोएंका मार्ग,
नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.

Ph.: 022 27453687

**GOVERNMENT SERVENTS CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED**
(Reg. No. KBA / HSG107 dT. 15-8-66)
Office Address: CIDCO Plot No. 2 / 53, Chaitra Marg,
Sector No. 2, New Panvel, Dist Raigad

Ref. No.: Date:

## जाहीर नोटीस

सर्व सभासदांना सूचित करण्यात येते की, आमच्या सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, Government Servents Co-operative Housing Society Limited (also known as Sarkari Nokar Sahakari Malki Gruha Nirman Sanstha Maryadit), (Reg. No. KBA/HSG 107 DT.15.08.1966) कार्यालयीन पत्ता सिडको प्लॉट क्र.२/५३, चैत्र मार्ग, सेक्टर - ०२, नवीन पनवेल येथील काही सभासद दीर्घकाळापासून सोसायटीच्या कोणत्याही कामकाजात सहभागी नसून, त्यांनी कोणताही संपर्क ठेवलेला नाही. खालीलप्रमाणे अशा सभासदांची यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सभासदांची यादी**

| SR NO | NAME AS PER CIDCO | Name in Marathi (मराठी) |
|---|---|---|
| 1 | Kashinath Balaji Gaikwad | काशिनाथ बालाजी गायकवाड |
| 2 | Ganpat Sambhaji Wadkar | गणपत संभाजी वाडकर |
| 3 | Madhav Atmaram Danave | माधव आत्माराम दानवे |
| 4 | Hussain Abbas Khatib | हुसेन अब्बास खातिब |
| 5 | Vaman Govind Mule | वामन गोविंद मुळे |
| 6 | Shrikant Shankar Ghodkhindi | श्रीकांत शंकर घोडखिंडी |
| 7 | S. U. Pradhan | शरद उमाकांत प्रधान |
| 8 | P. M. Thale | पी. एम. थळे |
| 9 | M. S. Mundhe | एम. एस. मुंढे |
| 10 | Sakharam Sitamram Padwal | सखाराम सिताराम पडवळ |
| 11 | Rambhau Walku Gavandi | रामभाऊ वाळकू गवंडी |
| 12 | Harishchandra Shivram Pawar | हरिश्चंद्र शिवराम पवार |
| 13 | A. D. Sane | अ. द. साने |
| 14 | Vasant Kanu Singasane | वसंत कानू सिंगासने |
| 15 | Dattatrya Maruti Ghanekar | दत्तात्रय मारुती घाणेकर |
| 16 | Balkrusna Nana Dawate | बालकृष्ण नाना दवटे |
| 17 | Narsudas Bhiku Gandhi | नरसुदास भीकू गांधी |
| 18 | Bapurao Krushnaji Bhosale | बापूराव कृष्णाजी भोसले |
| 19 | Krushna Laxman Kolge | कृष्णा लक्ष्मण कोलगे |
| 20 | Manohar Ganpat Waskar | मनोहर गणपत वासकर |
| 21 | Madhukar Ramchandra Mokashi | मधुकर रामचंद्र मोकाशी |
| 22 | Sharadkumar Shriniwas Rao | शरदकुमार श्रीनिवास राव |
| 23 | R. V. Lonkar | आर. व्ही. लोणकर |
| 24 | Vasant Ganesh Dongre | वसंत गणेश डोंगरे |
| 25 | Madha Narayan Deshpande | माधव नारायण देशपांडे |
| 26 | K. S. Thakur | के. एस. ठाकूर |
| 27 | Keshav Damodar Bhat | केशव दामोदर भट |
| 28 | Yashwant Balkrishan Paradkar | यशवंत बालकृष्ण पराडकर |
| 29 | Bal Gangadhar Dharap | बाळ गंगाधर धारप |
| 30 | Shankar Dagaduji Salvi | शंकर दगडुजी साळवी |
| 31 | Krishnaji Baburao Sawant | कृष्णाजी बाबूराव सावंत |
| 32 | Kamlakar Shripad Warerkar | कमलाकर श्रीपाद वरेरकर |
| 33 | Suryakant Raghunath Deshpande | सूर्यकांत रघुनाथ देशपांडे |
| 34 | Suresh Krushna Kamat | सुरेश कृष्णा कामत |
| 35 | Manohar Krushnarao Deshpade | मनोहर कृष्णराव देशपांडे |
| 36 | Dattatray Ramchandra Kadam | दत्तात्रय रामचंद्र कदम |
| 37 | Raghunath Tukaram Sondkar | रघुनाथ तुकाराम सोंडकर |
| 38 | Madhukar Shridhar More | मधुकर श्रीधर मोरे |
| 39 | Ramakant J. Nagavekar | रमाकांत ज नागवेकर |
| 40 | P. H. Chonkar | पी. एच. चोणकर |
| 41 | Bhaskar Narayan More | भास्कर नारायण मोरे |
| 42 | Shrikrishn Shridhar Bhise | श्रीकृष्ण श्रीधर भिसे |
| 43 | Dattatray Shankar Godabole | दत्तात्रय शंकर गोडबोले |
| 44 | Raghunath Krushnaji Jondhale | रघुनाथ कृष्णाजी जोंधळे |
| 45 | Vasant Anant Helekar | वसंत अनंत हेलेकर |
| 46 | Vinayak Kashinath Tipnis | विनायक काशिनाथ टिपणीस |
| 47 | V. P. Patil | व्ही. पी. पाटील |
| 48 | R. R. Kochreker | आर. आर. कोचरेकर |
| 49 | V. S. Naik | व्ही. एस. नाईक |
| 50 | Shataram Daji Haldankar | शांताराम दाजी हळदणकर |
| 51 | Namdeo Ramchandra Patil | नामदेव रामचंद्र पाटील |
| 52 | P. S. Ghadge | पी. एस. घाडगे |
| 53 | V. B. Thuse | व्ही. बी. ठुसे |
| 54 | D. M. Tamhankar | डी. एम. ताम्हणकर |
| 55 | Dattatraya Atmaram Ambye | दत्तात्रय आत्माराम अंबिये |
| 56 | S. A. Engineer | एस. ए. इंजिनिअर |
| 57 | Vinayak Jaitu Raut | विनायक जयतू राऊत |
| 58 | K.V.Thakur | के. व्ही. ठाकूर |
| 59 | M. B. Khandagale | एम. बी. खंडागळे |
| 60 | P.S. Manchekar | पी. एस. मंचेकर |
| 61 | I. A. Chogule | आय. अ. चोगुले |
| 62 | A. G. Patil | ए. जी. पाटील |
| 63 | A.D. Tribhuvan | ए.डी. त्रिभुवन |
| 64 | John Paul Tribhuvan | जॉन पॉल त्रिभुवन |
| 65 | V. S. Pavshe | व्ही. एस. पावशे |
| 66 | W. S. Walavakar | डब्ल्यू. एस. वालावलकर |
| 67 | C. S. Karnik | सी. एस. कर्णिक |
| 68 | R. G. Kadam | आर. जी. कदम |
| 69 | B.B. Gothavade | बी. बी. गोतावडे |
| 70 | Sadashiv Gangaram Chavan | सदाशिव गंगाराम चव्हाण |
| 71 | M. K. Samarth | एम. के. समर्थ |
| 72 | L. K. Kunte | एल. के. कुंटे |
| 73 | S. M. Vaishampayan | एस. एम. वैशंपायन |
| 74 | K. B. Gurjar | के. बी. गुर्जर |
| 75 | D. G. Salvi | डी. जी. साळवी |
| 76 | V. V. Shetye | व्ही. व्ही. शेटये |
| 77 | D. R. Phadke | डी. आर. फडके |
| 78 | V. V. Joshi | व्ही. व्ही. जोशी |
| 79 | R.N. Kulkarni | आर. एन. कुलकर्णी |
| 80 | G. B. Patil | जी. बी. पाटील |
| 81 | T. J. Bade | टी. जे. बडे |
| 82 | M.S. Deshmukh | एम. एस. देशमुख |
| 83 | E. K. Patil | ई. के. पाटील |
| 84 | G. B. Potdar | जी. बी. पोतदार |
| 85 | U. S. Randive | यू. एस. रणदिवे |
| 86 | P. K. Jadhav | पी. के. जाधव |
| 87 | D. S. Kubal | डी. एस. कुबल |
| 88 | M.B. Patil | एम. बी. पाटील |
| 89 | A. K. Karmarkar | ए. के. करमरकर |
| 90 | V.S. Kamat | व्ही. एस. कामत |
| 91 | S. K. Tipnis | एस. के. टिपणीस |
| 92 | S. R. Naik | एस. आर. नाईक |
| 93 | D. R. Patil | डी. आर. पाटील |
| 94 | D. V. Mehata | डी. व्ही. मेहता |
| 95 | K. A. Salunke | के. ए. साळुंके |
| 96 | S. N. Pradhan | एस. एन. प्रधान |
| 97 | G. M Pai | जी. एम. पै |
| 98 | V. L Gawai | व्ही. एल. गवई |

वरील सभासदांचे अलिकडील पत्ते अथवा संपर्क उपलब्ध नसल्यामुळे संस्थेच्या वतीने ही सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी कोणतीही व्यक्ती/वारस यांना वरील सभासदांच्या संदर्भात कोणतेही कायदेशीर दावा, मालकी, वारस हक्क, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत संस्थेच्या नावावर लेखी स्वरूपात व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतींसह तसेच पॅनकार्ड व आधारकार्ड घेऊन सोसायटीच्या कार्यालयात सादर करावी.

निश्चित कालावधीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दावे अथवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

ही नोटीस संबंधित सर्व व्यक्तींना वैध व पुरेशी कायदेशीर पूर्वसूचना मानण्यात येईल.

निवेदनार्थ,

सही/-
सचिव
**सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
**सेक्टर २, नवीन पनवेल**

# मच्छिमार डिझेल परताव्याच्या प्रतीक्षेत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

**एक ऑगस्टपासून मासेमारीचा नवा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे उरणच्या करंजा, मोरा तसेच अनेक बंदरांवर मच्छिमारांची लगबग सुरू झाली आहे. मात्र, मासेमारी करण्यासाठी लागणारा डिझेल तेल अनुदान मिळण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाकडून परवानगी मिळण्याची प्रतीक्षा आहे. जोपर्यंत मत्स्य विभागाच्या आयुक्तांकडून परवानगी मिळत नाही, तोपर्यंत मासेमारी बोटी घेऊन समुद्रात उतरता येणार नाही. त्यामुळे मच्छिमारांची आर्थिक अडचण निर्माण झाली आहे.**



मासेमारी करणाऱ्यांना शासनाकडून मासेमारीसाठी वापरण्यात येणाऱ्या बोटींना वर्षाकाठी ३५ हजार लीटर डिझेल दिले जाते. या डिझेलवर शासनाकडून डिझेलवरील वॅट किंवा लीटरमागे १८ रुपयांची सूट दिली जात आहे. यालाच 'मच्छिमार डिझेल परतावा' असे म्हणतात. हे तेलावरील अनुदान शासनाच्या मत्स्य विभागाने त्याचा कोटा मंजूर केल्याशिवाय मिळत नाही. तर मागील दोन ते तीन महिन्यांचे डिझेलवरील परतावे थकले आहेत. याचा परिणाम मासेमारीच्या नव्या हंगामावर होण्याची शक्यता आहे. शासनाने पावसाळ्यात घातलेली खोल समुद्रातील मासेमारी बंदी उठविण्यात आली आहे. त्यामुळे एक ऑगस्टपासून मासेमारी सुरू झाली आहे. गेल्या काही महिन्यातील सरकारकडून डिझेल कोटा मिळाला नाही. त्यामुळे हजारो मच्छिमारांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. हा कोटा सरकारने लवकरात लवकर मंजूर करावा, अशी मागणी मच्छिमारांनी शासनाकडे केली आहे.

### एका फेरीसाठी चार लाख रुपये खर्च

मासेमारी करण्यासाठी जाणाऱ्या एका बोटीसाठी किमान चार लाख रुपये खर्च येतो. यात सर्वात अधिक खर्च डिझेलचा असतो, अशी माहिती करंजा येथील मच्छिमार नेते रमेश नाखवा यांनी दिली आहे. बोट मालक आणि बोटीवर काम करणारे खलाशी व चालक तांडेल यांच्यात खर्च जाऊन मिळणाऱ्या नफ्याचा निम्मा-निम्मा वाटा हा समान वाटण्यात येतो. एका फेरीसाठी किमान चार ते पाच दिवस लागतात. गतवर्षी सुरू झालेल्या करंजा येथील बाजारात दररोज दोन कोटींचा व्यवहार होत होत आहे. त्यामुळे दहा महिन्यांत ५०० कोटींच्या मासोळीची निर्यात झाली असल्याची माहिती करंजा मच्छिमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी दिली.

### करंजा द्रोणागिरी बंदरात खवय्यांची गर्दी

गेल्या वर्षापासून उरणच्या करंजा बंदरात मासळी बाजार सुरू झाला आहे. त्यामुळे बंदी उठताच खरेदीसाठी मोठी गर्दी होऊ लागली आहे. स्वस्त दरात मासळी खरेदी करण्यासाठी खवय्ये करंजा मच्छी बंदरात गर्दी करत आहेत. करंजा, मोरा, दिघोडे, आवरे परिसरात मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारी करण्यात येत आहे. यामध्ये सुमारे ७०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी असून, मासळीची खरेदी विक्री करण्यासाठी त्यांना मुंबईतील ससून डॉक आणि भाऊचा धक्का येथे जावे लागत होते. दरम्यान, फिशिंग डॉक करंजा येथे उभारण्यात आले आहे. येथील खरेदी विक्रीमुळे द्रोणागिरी मत्स्यव्यवसाय बंदर मासळी खरेदीसाठी महत्त्वाचे ठरत आहे.

---

# कोप्रोली रस्त्यावरील अतिक्रमणात वाढ

**। उरण । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक बांधकाम विभाग उरण यांच्या अखत्यारीत असलेल्या कोप्रोली रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले आहे. त्यामुळे दरदिवशी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. तसेच व्यावसायिकांनी रस्त्यावर मोठ मोठे दगड, ज्वलंतशील गॅस सिलिंडर ठेवल्याने प्रवाशी वाहनांना अपघात होण्याचा धोकाही निर्माण झाला आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभाग उरण यांनी रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.



रस्त्यावर अपघाताची भीती

जेएनपीए बंदरामुळे उरण परिसरात मोठ्या प्रमाणात गोदामांची संख्या बळावली असून, नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे कोप्रोली रस्त्यावर सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याने त्याचा नाहक त्रास हा सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने कोप्रोली रस्त्याचे करोडो रुपये खर्च करून रुंदीकरण करण्याचे काम हाती घेतले. मात्र, व्यावसायिकांनी रस्त्यावर मोठ मोठे दगड, ज्वलंतशील गॅस सिलिंडर ठेवल्याने प्रवासी वाहनांना अपघात होण्याचा धोकाही निर्माण झाला आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभाग उरण यांनी रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

> **कोप्रोली रस्त्यावर दिवसेंदिवस अतिक्रमण वाढले आहे. त्यामुळे दरदिवशी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. असे असताना या ठिकाणा वरील व्यावसायिकांनी आपली मुजोरी कायम ठेवत ज्वलंतशील गॅस सिलिंडर तसेच वाहनांना अडथळा निर्माण करण्याच्या उद्देशाने मोठ मोठे दगड ठेवण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे अपघात होण्याचा धोकाही निर्माण झाला आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी पुढाकार घ्यावा.**
>
> **– दिपक पाटील, माजी उपसरपंच, पिरकोण**

# वृद्ध महिलेची आर्थिक फसवणूक करणाऱ्याला अटक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खांदेश्वर येथे २७ जुलैला एका ७० वर्षीय वृद्ध महिलेची ४७ लाखांची आर्थिक फसवणूक केल्याचे प्रकरण ताजे असताना एका २१ वर्षीय तरुणाला पनवेल महापालिकेत लिपीक पदावर नोकरी लावतो, असे खोटे आमिष दाखवून त्याच्याकडूनसुद्धा ३ लाख ७४ हजार रुपये उकळण्याचे दुसरे प्रकरण उजेडात आले आहे. संशयित आरोपी सचिन मोरे याच्याविरोधात पोलिसांनी मंगळवारी दाखल केले. मोरेला खांदेश्वर पोलिसांनी अटक केली आहे.

नवीन पनवेल येथील सेक्टर १५ ए येथील जय जयवंती सोसायटीत राहणाऱ्या ७० वर्षीय वृद्ध महिलेने फसवणूक झाल्याबद्दल तक्रारी अर्ज पोलीसांकडे आल्यानंतर पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय वणे यांनी संशयित आरोपी सचिन मोरे त्याची मुलगी व वडिलांच्या बँक खात्यांवर पीडित वृद्ध महिलेकडून ४७ लाख ७९ हजार २८५ रुपये वळते झाल्याचे स्पष्ट झाले. पीडितेच्या पतीचे निधन झाले असून, त्यांची मुलगी परदेशी राहात असल्याचे समजल्यावर मोरे याने पहिल्यांदा पीडितेचे घर भाड्याने घेऊन त्यांचा विश्वास संपादन केला.

---

# पाच लाख घेऊन चौघे पसार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बोलण्यात गुंतवून पाच लाख रुपयांची निळ्या रंगाची सॅक जबरदस्तीने खेचून चौघेजण इटिंगा कारमधून पळून गेले. याप्रकरणी रमेश पटेल आणि चार अनोळखी इसमांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तौहिद खान हा नालासोपारा येथे राहात असून, त्याला एजंट अमोल याचा फोन आला आणि प्लॉट खरेदी करायचा आहे का? असे विचारले. मामा अब्दुल कादर यांना प्लॉट पसंत पडला तर खरेदी करण्यास तयार होईन, असे खान याने सांगितले. अमोलने फोन करून कॉन्फरन्सवर जयेश या त्रयस्थ इसमासोबत खानचे बोलणे करून दिले. यावेळी पनवेलमध्ये जागा दाखवतो, यासाठी पाच लाख रुपये घेऊन या, असे सांगितले. त्यानुसार पनवेल स्टेशन येथे येण्यास सांगितले. खान पनवेल स्टेशन येथे गेले असता त्यावेळी जयेशला फोन केला असता रमेश हा इसम तुम्हाला न्यायला, येईल असे सांगितले.

यावेळी एक इसम त्यांच्या जवळ आला व त्याने रमेश पटेल असे त्याचे नाव सांगितले. काही वेळात अब्दुल कादर हे पैसे घेऊन आले. यावेळी ते तिघेजण जागा बघण्यासाठी पुढे चालत गेले. यावेळी पाठीमागून एक इटिंगा कार आली आणि त्यातील इसमांनी काठी दाखवून मारण्याची धमकी देत पैशांची बॅग घेऊन पळ काढला.

# तोतया पोलिसाने महिलेस लुबाडले

**पनवेल :** फूटपाथवरून चालत असताना ३९ वर्षीय महिलेच्या गळ्यातील १८ ग्रॅमची चेन खेचून चोरटे पसार झाले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. वीणा घाडगे या खारघर, सेक्टर २० येथे वास्तव्यास आहे. त्या सकाळी विश्वज्योत शाळेच्या बाजूच्या रस्त्याने पायी जात होत्या. यावेळी फूटपाथवरून चालताना दोन इसम मोटारसायकलवर आले आणि तुमच्या गळ्यातील सोने आहे ते काढा, असे सांगितले. तसेच दुसऱ्या एका अनोळखी इसमाला त्यांनी सांगून चेन काढायला सांगितली.

# शेलू पूल ते मोहिली रस्त्याच्या कामाला सुरुवात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातून वाहणाऱ्या उल्हास नदीवर शेलू बांधण्यात आलेल्या पुलाच्या दोन्ही बाजूला रस्ता नव्हता. त्यामुळे वाहनचालकांना रस्ता नसल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण होत होते. मात्र, जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीमधून रस्त्याचे काम मंजूर झाले असून, कच्चा रस्ता बनविण्यात आला असल्याने रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना वाट चुकण्याचा धोका कमी झाला आहे.



उल्हास नदीवर पाच कोटी खर्चून पूल बांधण्यात आला. या पुलावरून मागील दोन वर्षांपूर्वी वाहनांची वाहतूक सुरू झाली आहे. मात्र, त्या पुलाच्या दोन्ही बाजूचे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाने पक्क्या स्वरूपात तयार केले नाहीत. त्याचा परिणाम रस्ते तयार झालेले नसल्याने शेलू गावातून अवसरेकडे येणारे वाहनचालकांना रस्ता दिसत नसल्याने वाहनचालक स्वतःला हरवून जायचे. रात्रीच्या वेळी तर हा रस्ता भूलभुलैया वाटायचा आणि त्यामुळे रात्रीच्या वेळी तर नवीन वाहनचालक या पुलाचा वापर करायला टाळत होते. पावसाळ्यात तर गवत उगवल्यावर वाहनाच्या वाहतुकीने निर्माण झालेली वाट पुसून जायची आणि त्यामुळे वाहनचालक रस्ता शोधताना भरकटत.

वाहनचालक यांची ही गैरसोय लक्षात घेऊन या पुलासाठी अनेक वर्षे पाठपुरावा करणारे कार्यकर्ते भरत भगत यांनी रायगड जिल्हा नियोजनमधून अवसरे भागाकडे जाणारा रस्ता बनवून घेण्यासाठी निधी मंजूर करून आणला.

---

# सीबीएससी कनिष्ठ महाविद्यालयाची सुरूवात

**। पेण । प्रतिनिधी ।**

एनव्हीजी एज्युकेशन सोसायटीच्या कोनायन्सन स्कूलमध्ये सीबीएससी अभ्यासक्रमाच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक शिक्षण महर्षी बापुसाहेब नेने यांच्या हस्ते झाले.




सर्वप्रथम प्रमुख अतिथी शिक्षणमहर्षीबापुसाहेबनेनेयांचेस्वागत शाळेच्या बँड पथकाकडून करण्यात आले. त्यानंतर सरस्वती पूजन, दीप प्रज्वलन आणि नंतर बापूसाहेबांच्या हस्ते फीत कापून अकरावीच्या वर्गाचे औपचारीक उद्घाटन केले. या शिक्षण सोसायटीमध्ये सायन्स, कॉमर्स आणि आर्टस या तिन्ही शाखांचे अकरावीचे प्रवेश सुरू झाले आहेत आणि एक तारखेपासून हे कनिष्ठ महाविद्यालय सुरू होणार आहे.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत पेण एनव्हीजी एज्युकेशन सोसायटीच्या संचालक मंडळाकडून करण्यात आले. त्यावेळी व्यासपीठावर शिक्षणमहर्षी बापुसाहेब नेने, मा. नगराध्यक्षा प्रितम पाटील, बापूसाहेब आठवले, बोरगाव मा. सरपंच नाना महाडिक, मा. उपनगराध्यक्ष दिपक गुरव, संचालक मंडळापैकी अध्यक्ष डॉ. मनिष वनगे, उपाध्यक्ष डॉ. सोनाली वनगे, सचिव अ‍ॅड. मंगेश नेने, खजिनदार ज्योती गुरव यांच्यासह मुख्याध्यापिका सुप्रिया वेखंडकर, जमिना शिरपुरवाला आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जमिना शिरपुरवाला यांनी केले.

# उरणमध्ये महसूल सप्ताहाचे आयोजन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

१ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या विशेष महसूल सप्ताहात उरण तालुक्यातील शेतकरी, नागरिकांच्या जमिनी, विविध दाखल्यांची पूर्तता व वाटपाच्या कार्यक्रमाची सुरुवात केली जाणार आहे. या आयोजित महसूल सप्ताहाचा तालुक्यातील शेतकरी, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घेण्याचे आवाहन उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी केले आहे. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यभरात १ ते ७ ऑगस्टदरम्यान विशेष महसुली सप्ताह साजरा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हा महसूल सप्ताह राज्यातील प्रत्येक तालुक्यात राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार उरण तालुक्यातही शुक्रवारपासून पुढील सात दिवस विशेष महसूल सप्ताह आयोजित करण्यात येणार आहे. सप्ताहाच्या शुभारंभाच्या पहिल्याच दिवशी महसुली संवर्गातील कार्यरत, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गुणगौरव करुन त्यांना पुरस्कार, प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येणार आहे. या सप्ताहाचे नागरिक, शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी केले आहे.

---

**रेवंदडा येथील सिनेगॉगला भेट** | **इस्त्रायलचे वाणिज्य दूत कोबी शोशानींचे उद्‌गार**

# भारतात ज्यू धर्मियांना सन्मानाची वागणूक

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

**भारतात दोन हजार वर्षांपासून ज्यू धर्मीय राहात आहेत. त्यांची संस्कृती, उत्सव, सण, व्यवसाय यांच्याशी भारतातील नागरिक समरस झाले असून, देशात ज्यू धर्मियांना सन्मानाची वागणूक दिली जाते, असे मत इस्लायल देशाचे वाणिज्य दूत कोबी शोशानी यांनी गुरुवारी (दि.३१) व्यक्त केले. रेवदंडामधील ज्यू धर्मियांच्या सिनेगॉगला त्यांनी भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते.**



● (छायाचित्र : अभय आपटे)



ज्यू धर्मियांच्या चालीरिती, या ठिकाणी वसाहतीत असलेली कुटुंबे, उत्सव, सण, उद्योग, सिनेगॉगबद्दलची माहिती पर्यटनाच्या दृष्टीने व्हावी यासाठी येथील सिनेगॉगच्या प्रवेशद्वारजवळ माहितीचा खजिना एकाच क्लिकवर करून देण्यासाठी स्कॅनर बसवण्यात आला असून, त्याचे उद्घाटन शोशानी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वाणिज्य दूत यांच्या मुंबई कार्यालयातील मुख्य व्यवस्थापक हामीम तळकर यांनी सांगितले, पुढील काही दिवसांत वाणिज्य दूत इस्लायलमध्ये जाणार आहेत. त्यावेळी ही सर्व माहिती एकत्रित संकलित करणार असल्याचे सांगितले.

येथील सिनेगॉगच्या कार्यकारी मंडळांनी पुष्पगुच्छ देऊन शोशानींचे स्वागत केले. त्यावेळी स्थानिक ज्यू महिला उपस्थित होत्या. वाणिज्य दूत यांनी सिनेगॉगमध्ये दीप उजळून सर्वांसमवेत प्रार्थना केली, तसेच १८४२ मध्ये याची उभारणी केली आहे, याबाबत माहिती घेतली. येथील ज्यू धर्मियांनी पारंपरिक उद्योग टिकवून ठेवले आहेत, याबाबत समाधान व्यक्त केले.

आपला समाज संख्येने लहान असल्याने सर्वांनी एकोप्याने व आनंदाने राहावे, असे आवाहन कोबी शोशानी यांनी केले. त्यांचे ज्यू समाजाकडून यथोचित स्वागत करण्यात आले. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी इस्त्रायलचे वाणिज्य दूत कोबी शोशानी, प्रशासन अधिकारी हाईम तलकर, पब्लिक डिप्लोमोसी मिसेस हदर सपोर्मस, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, रेवदंडा ग्रामस्थांसह इस्त्रायलचे बांधव उपस्थित होते.

---

## निवडक

# महाड-रायगड राष्ट्रीय महामार्ग होणार 'छत्रपती महामार्ग'

**महाड :** केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची रायगड प्राधिकरणाचे अध्यक्ष युवराज छत्रपती संभाजी राजे यांनी भेट घेत, रायगडाच्या दिशेने जाणाऱ्या महाड-रायगड राष्ट्रीय महामार्गाच्या प्रगतीबाबत माहिती दिली. या रस्त्याचा ऐतिहासिक आणि भावनिक वारसा लक्षात घेता त्याला 'छत्रपती महामार्ग' असे नाव देण्याची मागणी मांडली. त्यास मंत्री गडकरींनी मान्यता दिल्याची माहिती संभाजी राजे छत्रपती यांनी समाज माध्यमांद्वारे दिली आहे.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची माहिती

पूर्वीछोटाववळणावळणाचा असलेला हा रस्ता २०६ कोटींच्या निधीमधून विकसित होत आहे. जवळपास ९० टक्के काम पूर्ण झाले असून, शिवराज्याभिषेकाच्या काळात होणारी लाखोंची ऐतिहासिक गर्दी आणि नियमित वाहतूक सुरळीत करण्यासाठी ही मोठी सुविधा ठरते आहे.

या महामार्गावर शिवजन्म ते राज्याभिषेकापर्यंतचा इतिहास, पथदिवे, विश्रांतीस्थळे, ऐतिहासिक शिल्पं व सांस्कृतिक दर्शन घडवणारे घटक असावेत, अशी संकल्पना संभाजी राजे यांनी मांडली० यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तात्काळ मान्य करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. वाढीव निधीची तरतूद कशी करता येईल, यावरही मार्गदर्शन केले. दरम्यान, युवराज छत्रपती संभाजी राजे यांनी रायगड प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने आणि लाखो शिवभक्तांच्यावतीने मंत्री गडकरी यांचे आभार व्यक्त केले.

# कर्जत बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी अ‍ॅड. मनोज क्षीरसागर



(छायाचित्र : संजय गायकवाड)

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत न्यायालयातील ज्येष्ठ वकील अ‍ॅड. मनोज क्षीरसागर यांची नुकतीच कर्जत बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीनंतर न्याय क्षेत्रात व वकिली समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अ‍ॅड. क्षीरसागर हे गेल्या अनेक वर्षांपासून कर्जत न्यायालयात न्यायालयीन कामकाजात सक्रिय आहेत. त्यांच्या संयमी स्वभावामुळे, न्यायनिष्ठ दृष्टिकोनामुळे आणि नेतृत्वगुणांमुळे ते वकिलांमध्ये विशेष लोकप्रिय मानले जातात. त्यांच्या नेतृत्वात वकिलांचे हित जपले जाईल, असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला आहे. या निवडीनंतर आयोजित सत्कार समारंभात माजी अध्यक्ष अ‍ॅड. सुनील भोंग, अ‍ॅड. संजय झेंडे, अ‍ॅड. जाधव, अ‍ॅड. यज्ञेश भागवत, अ‍ॅड. फड, अ‍ॅड. भगत आदी ज्येष्ठ वकिलांनी अ‍ॅड. क्षीरसागर यांच्या कार्यशैलीचे, सातत्यपूर्ण प्रयत्नांचे आणि नेतृत्वक्षमतेचे भरभरून कौतुक केले. आपल्या निवडीनंतर भावना व्यक्त करताना अ‍ॅड. मनोज क्षीरसागर म्हणाले,''ही निवड म्हणजे माझ्यावर ठेवलेला विश्वास आहे. मी बार असोसिएशनच्या सर्व सदस्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. न्यायव्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी, वकिलांच्या कल्याणासाठी आणि गरजू व दुर्बल घटकांपर्यंत न्याय पोहोचवण्यासाठी मी पूर्णपणे कटिबद्ध आहे.''



# उर्दूशाळेतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील नजात सोशल अँड एज्युकेशनल ट्रस्टतर्फे नगरपरिषदेच्या स्व. नमिता नाईक सभागृहात उर्दू शाळेतील दहावीतील (बॅच २०२४-२५) उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कैसर दणदणे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. अलिबाग नगरपरिषदेच्या माजी उपनगराध्यक्षा अ‍ॅड. मानसी म्हात्रे, नजात सोशल अँड एज्युकेशनल ट्रस्ट, अलिबागचे संस्थापक अध्यक्ष लायन डॉ. साजिद शेख व सहसचिव फिरदौस शेख, उर्दू माध्यमिक शाळा व्यवस्थापन समिती सदस्य रमजान सय्यद, उर्दू प्राथमिक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आरिफ हकीम, उर्दू माध्यमिक शाळा शिक्षक, पालक समिती अध्यक्ष शाहनवाज शेरखान, मुख्याध्यापिका सबिहा चिविलकर व फरहीन धायरेकर यावेळी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दहावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- Fresh graduates required for the post of office staff in Alibag. For interview call 9923750539, 9422383099
- अलिबागमध्ये ब्युटी पार्लर कामासाठी अनुभवी मुले, मुली पाहिजे. मो. ८१४९८६५६५५
- अलिबाग येथील ऑफिस कामाकरीता इंग्लिश व मराठी टायपिंग येणारी टायपिस्ट पाहिजे. मो.नं. ९१४६६२४५१० वेळ सकाळी १० ते ६
- Office च्या कामासाठी मुलगी पाहिजे. पात्रता B.com typing मराठी english, tally ms office. No. 9823173508 शिंदे हॉस्पिटल, अलिबाग
- ड्रायव्हर पाहिजे. ऑटोमॅटीक कार ड्रायव्हिंग येणारा ड्रायव्हर पाहिजे, ठिकाण : बामणसुरे, चोंढी. रविवारी सुट्टी. संपर्क :९०४९६५५५२३
- ऑफिसमध्ये कामाला मुलगी पाहिजे. पात्रता Bsc, आणि कॉम्प्यूटरची माहिती, वेळ : सकाळी ९ ते सायं. ६-३०, ठिकाण बामणसुरे, चोंढी, पगार : १०,००० महिना, रविवारी सुट्टी. संपर्क :९८२३५८५३२१
- दुकान गाळा विक्री करणे आहे. अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ, संपर्क : ९७६४५४८६७९
- घर भाड्याने/विकणे आहे. भाडे १८,०००/- डिपॉजिट ५०,०००/- चेंढरे संपर्क - ९१७५८००४३०
- वाघ्रण परिसरात ३ एकर जागेमध्ये भाडे तत्त्वार ४ तळे देणे आहे. राहण्यासाठी घर उपलब्ध आहे. संपर्क-माधुरी पाटील ९२०९८९५३५८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# वैविध्यपूर्ण बुद्धिबळपट



नॉलेज

दोस्तांनो, बुद्धिबळ खेळताना आपल्या मेंदूचा कस लागतो. या खेळातली प्रत्येक चाल हुशारीने खेळावी लागते. भारतानेच जगाला बुद्धिबळाची देणगी दिली. विश्वनाथन आनंदने ग्रँडमास्टर म्हणून नाव कमावलं. तुम्हालाही बुद्धिबळ येत असेल, तुमच्याकडेही बुद्धिबळाचा पट असेल. पण जगभरात वैशिष्ट्यपूर्ण बुद्धिबळाचे पट पहायला मिळतात. अशाच काही आखीव रेखीव आणि सुंदर बुद्धिबळपटांवर नजर टाकू या.

✻ बुद्धिबळपट सोन्या-चांदीचेही असतात. या पटांचा वापर खेळण्यासाठी नाही तर सजावटीसाठी केला जातो.

✻ जर्मनीमध्ये बीच वूडपासून अनोखा बुद्धिबळपट बनवण्यात आला आहे. सर्वसामान्य बुद्धिबळपटांच्या तुलनेत हा पट थोडा छोटा आहे. पण तो खूपच आकर्षक आहे.

✻ 'ॲप्रोच द बेंच' नावाचा एक बुद्धिबळपट आहे. वकिलांना समोर ठेऊन हा पट बनवण्यात आला आहे. या पटाच्या सोंगट्या पितळेच्या आहेत. तसंच या पटावरचे चौकोन काळेपांढरे नाहीत तर कोर्टरूमप्रमाणे चॉकलेटी लालसर रंगाचे आहेत.

✻ रोमन ग्लॅडिएटर्स थ्रीडी हा अनोखा बुद्धिबळपट आहे. या बुद्धिबळपटाची रचना थ्रीडी तंत्रज्ञानाने करण्यात आली आहे. शिवाय याच्या सोंगट्याही अनोख्या आहेत.

✻ बर्न जगरेब ५९ मालिकेतला बुद्धिबळपट खूप सुंदर आहे. याच्या सोंगट्यांवर कोरीव काम करण्यात आलं आहे.

# सोने पे सुहागा...

गंमतगोष्टी

आरती देशपांडे

छोट्या दोस्तांनो, हिंदीमधली 'सोने पे सुहागा' हा वाक्प्रचार तुम्हाला माहिती असेल. पण याचा अर्थ ठाऊक आहे का? सोने आधीच मौल्यवान असते. पण त्यावर सुहागा लावल्यास चमक वाढते. म्हणूनच हा वाक्प्रचार चांगल्या गोष्टीत आणखी चांगले गुण जोडण्यासाठी वापरला जाते. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी परीक्षेत अव्वल झाला आणि शिष्यवृत्तीही मिळाली तर त्याला 'सोने पे सुहागा' असे म्हणता येईल.

सुहागाला इंग्रजीमध्ये बोरॅक्स म्हणतात. हे एक नैसर्गिक खनिज असून त्याचे रासायनिक नाव सोडियम बोरेट असे आहे. ते पांढऱ्या पावडर किंवा क्रिस्टलच्या स्वरूपात आढळते आणि विविध घरगुती, औद्योगिक आणि आयुर्वेदिक उपचारांमध्ये वापरले जाते.



आता बोरॅक्स कोणत्या कामात वापरले जाते, हेदेखील पाहू या.

✻ बोरॅक्सचा वापर सोने आणि चांदीचे दागिने स्वच्छ करण्यासाठी आणि चमकवण्यासाठी सर्वात जास्त केला जातो. ते धातूतील अशुद्धता काढून टाकते आणि चमक वाढवते.

✻ खोकला, घसा खवखवणे आणि सांधेदुखीवर उपचार करण्यासाठी पारंपरिक औषधांमध्ये बोरॅक्सचा वापर केला जातो.

✻ पूर्वी कपडे धुण्यासाठी आणि डाग काढण्यासाठी बोरॅक्सचा वापर केला जात असे.

# नव्या युगातला आरसा

टेक नॉलेज



मुलींनो, सध्या अनेकजण फिटनेसबाबत जागरूक झाले आहेत. फिट रहाण्यासाठी, वजन कमी करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची डाएट्स केली जातात. जीममध्ये घाम गाळला जातो. विविध कंपन्या फिटनेस बँड्स बनवतात. हे बँड आपली आरोग्यविषयक माहिती साठवून ठेवतात. अमेरिकेतल्या 'मिरर' नावाच्या कंपनीने आरशासारखं उपकरण तयार केलं आहे. हा स्मार्ट मिरर आहे. हा मिरर फिटनेसबाबत मार्गदर्शन करणार आहे. या स्मार्ट मिररमधलं स्मार्ट तंत्रज्ञान समजून घेऊ. हा स्मार्ट मिरर स्मार्टफोनला कनेक्ट करून वापरता येईल. स्मार्ट मिररसाठी खास ॲपही तयार करण्यात आलं आहे. या ॲपद्वारे व्यायामाचा प्रकार निवडता येईल. यात जॉगिंग, योगा, जीम, स्ट्रेंथ ट्रेनिंग असे बरेच पर्याय आहेत. यात कॅमेरा, ऑडियो सिस्टिम आणि स्पीकर्स आहेत.


या स्मार्ट मिररमध्ये एलईडी डिस्प्ले बसवण्यात आला आहे. हा मिरर युजरला व्यायाम करण्याची प्रेरणा देईल. व्यायामाच्या वेळेची आठवणही करून देईल. तुम्ही किती वेळ व्यायाम करायला हवा हे ही सांगेल. या मिररच्या स्क्रीनवर वेगवेगळे व्यायामप्रकार सुरू राहतील. हे व्यायाम बघून तुम्हीही व्यायाम करू शकता.

# अनोखे विक्रम

फन टाईम

मुलांनो, या जगात इतरांपेक्षा वेगळं करणाऱ्यांची कमतरता नाही. ही माणसं काही तरी जगावेगळं करून जातात. त्यांच्या या कामगिरीची नोंद गिनिज बुक, लिमका बुक घेतं. हे लोक विक्रमवीर बनतात. अर्थात फक्त माणसंच विक्रम करतात असं नाही तर प्राण्यांच्या नावेही विक्रमांची नोंद होते. अशाच काही विक्रम वीरांची ओळख करून घेऊ.

✻ जिफपॉम नावाचा गोंडस कुत्रा इंटरनेट सेन्सेशन आहे. इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर तो ॲक्टिव्ह असतो. या कुत्र्याचे इन्स्टाग्रामवर ९० लाख फॉलोअर्स आहेत. जिफपॉमचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवण्यात आलं आहे.



✻ जेसिका कॉक्स ही पायलट आहे. पण तिला हात नाहीत. हात नसणारी ती जगातली एकमेव पायलट आहे. जेसिका पायांनी विमान चालवते. याच कारणामुळे तिचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवण्यात आलं आहे.

✻ अयोध्येत दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. या वेळी पाच लाख ६१ हजार पणत्या लावण्यात आल्या होत्या.

✻ आयटीसी या कंपनीने सर्वात महागडं चॉकलेट तयार केलं. या चॉकलेटची किंमत प्रतिकिलो ४.३ लाख रुपये आहे.

# हासरा, नाचरा श्रावण

वाचा तर खरं

पंकजा देव

मित्रांनो, श्रावण हा सृष्टीचे अनुपम सौंदर्य दाखवणारा महिना आहे. तुम्ही तो अनुभवत असाल. सततच्या पावसामुळे धूळ आणि प्रदूषण स्थिरावते, हवेत ताजेपणा आणि शुद्धता वाढते. झाडे खूप हिरवीगार होतात आणि जास्त ऑक्सिजन सोडत असल्यामुळे सभोवतालची हवा श्वास घेण्यास अधिक चांगली होते. हे शुद्ध वातावरण आपल्या फुफ्फुसांसाठी आणि संपूर्ण शरीरासाठी खूप फायदेशीर आहे.

या काळात वातावरणातील आर्द्रता वाढत असल्यामुळे आपली पचन प्रक्रिया मंदावू शकते. म्हणूनच पूर्वजांनी या काळात हलक्या आणि सहज पचणाऱ्या अन्नावर भर दिला आहे. उपवास करणे आणि फळे खाणे हा शरीर आतून स्वच्छ करण्याचा आणि पचनसंस्थेला विश्रांती देण्याचा एक वैज्ञानिक मार्ग आहे. हा नियम पाळल्यास शरीराला बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यास मदत होते.



पावसाळ्यात पाण्याशी संबंधित आजार वाढण्याचा धोका असतो. हे लक्षात घेऊन श्रावणात बरेच लोक उकळलेले पाणी पिण्याचा किंवा विशेष पदार्थ खाण्याचा आग्रह धरतात. पाण्यामुळे होणारे आजार टाळण्याचा हा एक प्राचीन मार्ग आहे. मंदिरांमध्येही तुळशीचा वारंवार वापर आणि गंगाजलाचे महत्त्व पाणी शुद्ध ठेवण्याशी आणि त्याचे औषधी गुणधर्म वाढवण्याशीच जोडलेला आहे.

या महिन्यातील हिरवा निसर्ग, थंड वारा आणि पावसाचे थेंब हे मानसिक शांतीसाठी कोणत्याही औषधापेक्षा कमी नाहीत. श्रावण आपल्याला निसर्गाच्या जवळ जाण्याची संधी देतो. ध्यान, पूजा आणि भक्तीमय वातावरण ताण कमी करण्यास आणि मन शांत ठेवण्यास मदत करते. निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवल्याने आपला मूड सुधारत असल्याचे वैज्ञानिकदृष्ट्याही सिद्ध झाले आहे.

मुलांनो, पावसामुळे केवळ पृथ्वी हिरवीगारच होत नाही तर भूजल पातळी वाढण्याचा, पुनर्भरण करण्याचा हा एक महत्त्वाचा काळ आहे. या महिन्यात नद्या, तलाव आणि विहिरी पाण्याने भरतात. हे जलसंवर्धनाचे एक मोठे चक्र आहे.

# आंबा लंगडा कसा?

गप्पांगण

वीणा देशमुख

छोट्या दोस्तांनो, उन्हाळ्यात तुम्ही भरपूर आंबा खाल्ला असेल. हापूस, पायरी, रायवळ यासारख्या जातीचा आंबा तर तुम्हाला विशेष आवडत असेल. आंब्यामध्ये केसर, चौंसा, तोतापुरी, मलगोबा, 'लंगडा आंबा' अशाही अनेक जाती आहेत. चला तर, आज 'लंगडा आंबा' या नावाचा इतिहास जाणून घेऊन या.




मित्रांनो, ही कहाणी आपल्याला वाराणसीच्या सुमारे ३०० वर्षांपूर्वीच्या रस्त्यांवर घेऊन जाते. त्यावेळी तेथील एका मंदिरात एक अपंग पुजारी राहत असे. त्याला लोक प्रेमाने 'लंगडा पुजारी' म्हणत. एके दिवशी एका संताने त्याला आंब्याच्या काही बिया दिल्या आणि मंदिराजवळ पेरण्यास सांगितले. त्यावेळी त्याने प्रतिज्ञा केली की, या झाडावर फळे येतील तेव्हा प्रथम देवाला अर्पण केली जातील आणि नंतर भक्तांमध्ये वाटले जातील.

काही वर्षांमध्ये त्या झाडाला आंबे लागले तेव्हा अप्रतीम चवीने सर्वांचेच मन जिंकले. ते आंबे इतके गोड, रसाळ आणि सुगंधी होते सगळ्यांना कमालीचे आवडले. तथापि, आता समस्या होती की, अशा खास आंब्याला नाव काय द्यायचे? लोकांनी विचारले की, हा आंबा कुठून आला, तेव्हा उत्तर आले ते त्या 'लंगडा पुजारी'च्या झाडावरुन...

बस्स, मग काय... या आंब्याला त्या पुजाऱ्याचेच नाव मिळाले. 'लंगडा आंबा'. हे नाव थोडे वेगळे असले तरी त्याची चव इतर आंब्यांपेक्षा खास असते. आता ही जात वाराणसीची शान बनली असून देशभर त्याला मोठी मागणी असते.

केवळ चवीसाठीच नाही तर आरोग्यासाठीही लंगडा आंबा फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन सी, फायबर, अँटीऑक्सिडंट्स आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. आयुर्वेदानुसार, हा आंबा शरीराच्या अनेक समस्यांना आराम देतो. तो हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर मानला जातो. यातील पोषक तत्त्वे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात. त्यात असणारे फायबर पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता, गॅस सारख्या समस्या दूर करते. तेव्हा पुढल्या वर्षी या जातीचा आंबा नक्की खा.

## ठिपके जुळवा



# रेल्वे ट्रॅकमध्ये दगड कशासाठी?

माहिती असावे

उर्मिला राजोपाध्ये



छोट्या मित्रांनो, तुम्ही कधी रेल्वे ट्रॅककडे बारकाईने पाहिले असेल तर दिसले असेल की, रुळांच्या मध्ये आणि खाली छोटे दगड ठेवलेले असतात. यामागचे कारण आज जाणून घेऊ या.


मुलांनो, या दगडांना 'बॅलास्ट' म्हणतात. रेल्वे ट्रॅकच्या स्थिरतेसाठी, सुरक्षिततेसाठी आणि दीर्घायुष्यासाठी ते आवश्यक असतात. तुम्ही जाणता की, ट्रेनचे वजन खूप जास्त असते. स्वाभाविकच ट्रेन वेगाने धावताना रुळांवर प्रचंड दाब असतो. मात्र हे बॅलास्ट दगड रुळांना घट्टपणे एकाजागी ठेवतात. ते एकमेकांशी जोडले जाऊन एक मजबूत आधार तयार करत असल्यामुळे रुळ हलत नाहीत. हे दगड नसतील तर रुळ हलू किंवा वाकडे होऊ शकतात. यामुळे अपघातांचा धोका वाढतो. दुसरे म्हणजे ट्रेनचे वजन थेट रुळांवर पडत असले तरी या दगडांमुळे ते पसरते आणि नंतर जमिनीवर प्रसारित होते. यामुळे रुळांवर असमान दाब पडू शकत नाही आणि ते बराच काळ टिकतात. हे दगड ठेवले नाहीत तर रुळ जमिनीत धसू शकतात किंवा तुटू शकतात. पावसाळ्यात रुळांभोवती पाणी साचते. त्यामुळे रुळ गंजण्याचा किंवा कमकुवत होण्याचा धोकाही असतो. पण या दगडांमध्ये अंतर असल्यामुळे पाणी सहजपणे बाहेर पडते आणि रुळ कोरडे राहतात. म्हणजेच ही ड्रेनेज प्रणाली रेल्वे ट्रॅकला पाणी साचण्यापासून आणि धूप होण्यापासून वाचवते.

तिसरी बाब म्हणजे ट्रेन जाताना कंपनं तयार होतात आणि आवाज निर्माण होऊ शकतो. मात्र हे दगड कंपने शोषून आवाज कमी करण्याचे कामही करतात. दगड नसतील तर ट्रेन चालताना जास्त आवाज करेल आणि आजूबाजूच्या भागात ध्वनी प्रदूषण वाढेल. उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात धातूचे ट्रॅक विस्तारतात आणि आकुंचन पावतात. असे असताना बॅलास्ट स्टोन रुळांना लवचिकता देतात आणि तापमानातील बदलांमुळे होणाऱ्या विस्तार किंवा आकुंचनाचे संतुलन साधतात. यामुळे रुळांमधील भेगा पडण्यास प्रतिबंध होतो आणि ते दीर्घकाळ सुरक्षित राहतात.




# कार्टोग्राफीचा विचार करा

कोण होणार?



सध्या विविध क्षेत्रांमध्ये कारकिर्दीच्या संधी निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी एक क्षेत्र आहे कार्टोग्राफीचं. हे कार्टोग्राफर्स वेगवेगळ्या प्रकारचे नकाशे म्हणजे मॅप्स तयार करतात. आज स्मार्टफोन वापरणारा प्रत्येकजण गूगल मॅप्सचा वापर करतो. जग जवळ येत आहे. इंटरनेटच्या वाढत्या प्रभावामुळे डाटा जपून ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. डिजिटल व्यासपीठांवर हा डाटा जपून ठेवला जातो. या क्षेत्रातही तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. म्हणूनच हे क्षेत्र कारकिर्दीच्या असंख्य संधी उपलब्ध करून देत आहे.

या क्षेत्रात कारकिर्द करण्यासाठी तुम्ही कार्टोग्राफी, जिओग्राफी किंवा या क्षेत्राशी संबंधित कोणत्याही विषयात पदवी मिळवू शकता. कार्टोग्राफी, जिओग्राफीमध्ये डिप्लोमा, मास्टर्स, एमफील किंवा पीएचडीसारखे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पर्यावरण आणि भूगोल या विषयांची गोडी असायला हवी. यासोबतच गणितावर प्रभुत्व असणं आवश्यक आहे. लेआउट, डिझायनिंगमध्ये गती असायला हवी. कार्टोग्राफीचं शिक्षण घेतल्यानंतर तुम्ही सरकारी विभागांसह संशोधन संस्थांमध्ये काम करू शकता. जीआयएस तसंच रिमोट सेन्सिंग टेक्नॉलॉजीचा वापर करणाऱ्या संस्थांनाही या तज्ज्ञांची गरज असते.

## दोस्त हे मस्त

### अशी असतात छोटुली पिल्लं



छोट्यांनो, प्राण्यांची पिल्लं खूप गोंडस असतात. नुकत्याच जन्मलेल्या हत्तीच्या पिल्लाचं वजन जवळपास ११२ किलो तर लांबी ८३ सेंटीमीटरच्या आसपास असते. एकशिंगी गेंड्यांच्या पिल्लाच्या नाकावर लहानपणी शिंग नसतं. पिल्लू मोठं झाल्यावर हे शिंग विकसित होतं. सीलच्या पिल्लाला 'पप्स' असं म्हणतात. गंमत म्हणजे ही पिल्लं जन्मल्यावर लगेच पोहू शकतात. पांडाच्या पिल्लांचं वजन खूपच कमी म्हणजे जवळपास १०० ग्रॅमच्या आसपास असतं. कुत्र्याच्या पिल्लांना जन्मल्यानंतर जवळपास दोन आठवडे दिसत नाही तसंच ऐकूही येत नाही.

## खादाडी

### गरमागरम चीझी राउंड




दोस्तांनो, चीझ राउंड हा पदार्थ एकदा बनवून बघा. यासाठी चार बटाटे उकडून घ्या. पाव कप बटर, किसलेलं अर्धा कप चीज, पाव कप कांद्याची पात, चमचाभर चिली फ्लेक्स, बटाट्यांचे गोलाकार काप एकत्र करून घ्या. यानंतर मायक्रोवेव्ह २०० अंशात प्री हिट करून घ्या. बटाट्याच्या चकत्यांच्या दोन्ही बाजूंना बटर लावून घ्या. आता बेकिंग ट्रे घ्या. त्यावर कुकीज शीट ठेवा. त्यावर बटाट्याचे काप ठेवा. यानंतर बटाट्यावर किसलेलं चीज घाला. थोडा वेळ मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. चीज वितळल्यावर बेकिंग ट्रे बाहेर काढा. त्यावर कांद्याची पात घाला. वरून चिली फ्लेक्स भुरभुरा. हे चीज राउंड सॉससोबत खा.

## स्टडी टिप्स

### अभ्यासाची शास्त्रीय पद्धत

छोट्यांनो, अभ्यासाच्या वैज्ञानिक पद्धती आहेत. या पद्धतींनी अभ्यास केल्यास बरेच लाभ होऊ शकतात. एकाच विषयाचा अभ्यास वेगवेगळ्या ठिकाणी केल्यामुळे अधिक चांगल्या प्रकारे लक्षात राहू शकतो. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गेल्यामुळे आपला मेंदू एकच माहिती वेगवेगळ्या पद्धतींनी साठवून ठेवतो. यामुळे स्मरणशक्ती सुधारते. हा प्रयोग करून बघायला हरकत नाही.



## योगा टाईम

### करा हे आसन

मुलांनो, पावसाळ्याच्या दिवसात तुम्ही वेगवेगळी आसनं करू शकता. यापैकीच एक म्हणजे सुप्त मत्स्येंद्रासन. हे आसन पलंगावर झोपूनही करता येतं. ते केल्याने पाठीचा कणा बळकट होतो. शिवाय स्नायूंची क्षमता वाढते. तेव्हा हे आसन करा आणि तंदुरुस्त रहा.



# कलासक्त

# सुपरस्टार काननदेवींची अद्भूत कहाणी

**बंगाली चित्रपट सृष्टीतील पहिली सुपरस्टार गायिका अभिनेत्री काननदेवी वेगवान गायनशैली असलेली गायिका होती. कानन बाला यांचा जन्म पश्चिम बंगाल येथे एका माहिष्य कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील रतनचंद्र दास यांचे सोन्याच्या दागिन्यांचे दुकान होते. काननदेवी यांचे शिक्षण कलकत्ता येथील सेंट एग्नेस कॉन्व्हेंट स्कूल मध्ये झाले होते.वडिलांच्या अचानक निधनाने काननदेवी आणि त्यांची आई राजोबाला यांच्यावर स्वत:च्या उदरनिर्वाहाची जबाबदारी आली. त्यांच्या शुभचिंतक तुलसी बॅनर्जी यांना त्या काळात सिनेसृष्टित काका बाबू म्हणत असत त्यांनी काननदेवी फक्त दहा वर्षांच्या असताना कलकत्ता येथील मदन थिएटरमध्ये करून दिली. तिथे काननदेवी यांना प्रथमच जयदेव(१९२६) या चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर आलेल्या शंकराचार्य या सिनेमापासून त्यांच्या चित्रपटात काम करायची सुरूवात झाली.**



**श्रीराम शेटये**

हळूहळू काननदेवी यांचा चांगलाच जम बसला. छोट्या वयापासून सुरूवात केलेली ही अभिनेत्री पुढे पहिली सुपरस्टार झाली तिचीच ही अद्भूत कहाणी.

चित्रपटसृष्टीत जेव्हा चित्रपटाचे बजेट १५-२० हजार असायचे आणि सिनेमाचे तिकीट सुमारे ३० पैसे होते, त्याकाळात एक सुपरस्टार गायक अभिनेत्री होती जी एका गाण्यासाठी १ लाख रुपये आणि एका चित्रपटासाठी ५ लाख रुपये घेत असे. ती चित्रपटसृष्टीतील पहिली अभिनेत्री होती, जिचे पोस्टर्स रस्त्यावर विकले गेले आणि तिच्या सौंदर्याचे दिवाने असणारे तरुण हे पोस्टर आपल्या रुममधील भिंतीवर लावत असत. भारतीय चित्रपटसृष्टीच्या सुरुवातीच्या गायक तारकांपैकी एक असणाऱ्या आणि बंगाली चित्रपटसृष्टीतून हिंदी चित्रपटसृष्टीत आलेल्या पहिल्या सुपरस्टार काननदेवी यांचा दि. १७ जुलै हा स्मृतिदिवस

एवढी प्रसिध्दी मिळाली, हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुपरस्टार झाल्यात, हॉलिवूडलाही जावून आल्यात तरी कानन देवी यांचा प्रवास सोपा नव्हता. संघर्ष लहानपणापासूनच जीवनाच्या पाचवीला पूजला होता. कानन देवी यांचा जन्म २२ एप्रिल १९१६ रोजी पश्चिम बंगालमधील हावडा येथे एका गरीब कुटुंबात झाला. घरच्या गरीबीच्या परिस्थितीमुळे मूळ पालकांनी रतनचंद्र दास आणि राजोबाला या जोडप्याला कानन देवी दत्तक दिल्या. श्रीमंत असणाऱ्या रतनचंद्र यांनी काननदेवींवर खऱ्या मुलीपेक्षा जास्त प्रेम केले. त्यांना अगदी लहान वयातच संगीताचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. मात्र नशीबात फार काळ सुख नव्हते. काननदेवी ६ वर्षाच्या असतांना त्यांना दत्तक घेणाऱ्या रतनचंद्र यांचे निधन झाले.

रतन आणि राजोबाला यांच्याशिवाय त्या घरात कोणीच नव्हते. रतनचे कर्ज फेडण्यासाठी आई राजोबाला यांचे दागिनेही विकले गेले. कुटुंब रस्त्यावर आले होते. घराचे भाडे भरण्यासाठी पैसे नसल्याने राजोबाला व कानन यांना भाड्याच्या घरातून बाहेर निघावे लागले. राजोबाला ६ वर्षांच्या काननसोबत कोलकात्यातील श्रीमंत लोकांच्या घरात काम करू लागल्या. काननही त्यांना छोट्या छोट्या कामांमध्ये मदत करू लागली. शाळेत जाण्याच्या वयात कानन यांच्या नशिबी नोकराचे जीणे आले.

त्यांच्या परिस्थितीची दया येवून एका नातेवाईकाने त्यांना स्वतःच्या घरी राहण्यास बोलावले. आतातरी दोन घास सुखाचे मिळतील म्हणून दोघी या नातेवाईकाकडे राहण्यास गेल्या पण इथेही दुर्दैवाने पाठ सोडली नाही. या नातेवाईकाने परिवारातील सदस्य म्हणून नाही तर घरातील कामे करायलाच त्यांना बोलावले होते. तो त्यांना तासनतास त्यांना घरातील काम करायला लावायचा. सोबत दूषणंही द्यायचा. या नातेवाइकांचे अत्याचार वाढत होते पण दुसरीकडे आधार नाही म्हणून दोघी त्याच्याकडे रहात होते. पण एक दिवस जेव्हा राजोबाला यांच्या हातून काचेची डिश फुटली तेव्हा अत्याचाराची मर्यादा ओलांडली गेली. प्रतिदिन अपमान सहन करत जगण्यापेक्षा स्वाभिमानाने उपाशी मेलेले चालेल या विचाराने राजोबाला यांनी सात वर्षाच्या काननदेवींना घेऊन नातेवाईकाचे घर सोडले. या घटनेचा काननदेवींच्या मनावर कायमचा ओरखडा उमटला. तिने मनाशी ठरवले की ती आता कोणाच्या घरात राहणार नाही. हा निर्णय त्यांनी आजीवन अंमलात आणला. पुढे लग्नानंतरही त्या पतीच्या घरी रहायला गेल्या नाही तर त्यांना आपल्या घरी राहण्यास भाग पाडले. ज्या नातेवाईकांनी अपमान केला होता, त्यांना कधीच माफ केले नाही. केवळ आईच्या सांगण्यावरून त्यांना मदत केली.

नातेवाइकांचे घर सोडल्यानंतर कानन आणि राजोबाला हावडा येथे परतले. एका वैश्यावस्तीजवळ छोटेसे घर घेवून, छोटी कामे मिळवून उदरनिर्वाह करु लागल्या. या दोघींच्या हलाखीच्या परिस्थितीवर दया येवून त्यांचे नाटकातून अभिनेता काम करणारे कौटुंबिक मित्र तुलसी बॅनर्जी म्हणजे काननदेवींचे काकाबाबू यांनी १० वर्षाच्या काननची मदन थिएटर आणि ज्योती थिएटरमध्ये शिफारस केली. बालपणापासूनच अतिशय सुंदर दिसणाऱ्या व तीक्ष्ण स्मरणशक्ती असणाऱ्या काननदेवींच्या हुशारी आणि सौंदर्याने प्रभावित होऊन मदन मूव्ही स्टुडिओने त्यांना चित्रपटातील भूमिकांसाठी दरमहा ५ रुपये पगार देऊन करारबद्ध केले. जयदेव या चित्रपटात त्यांना छोटीशी भूमिका मिळाली. खरे तर, कानन यांचा करार २५ रुपयांचा होता, परंतु मदन मुव्हीवाले त्यांना फक्त ५ रुपये देत असत. १९२८ - १९३१ पर्यंत कानन यांनी काही चित्रपटांमध्ये भूमिकांसोबत त्या काळातील संगीतकार हीरेन बोस, गीतकार धीरेन दास आणि कवी काझी नझरूल इस्लाम यांच्यासोबत काही गाणीही रेकॉर्ड केली.

तो काळ चित्रपटसृष्टीत महिलांची मोठी कमतरता असण्याचा होता. तरीही चित्रपटांमध्ये महिलांना कधीही आदराने वागवले जात नसे. कानन देवी परिस्थितीने चित्रपटांमध्ये आल्या होत्या. आपल्या अभिनय गुणांवर त्यांना ओळखही मिळाली, पण आदर मिळाला नाही. दिसायला सुंदर होत्या तरी अनेक दिग्दर्शकांनी त्यांचा अपमान केला परंतु कानन यांनी आत्मसन्मानाशी कधीही तडजोड केली नाही. त्यामुळे अनेक चित्रपट हातातून गेले. काही चित्रपटांचे चित्रीकरण थांबले. कानन बालपणातील आर्थिक अडचणींमुळे कधीही शाळेत जाऊ शकल्या नाहीत, पण चित्रपटसृष्टीत काम सुरु केल्यावर पैसे येताच कानन यांनी इंग्रजी, गणित, इतिहास शिकण्यासाठी एक वैयक्तिक शिक्षक नियुक्त केला. या अभ्यासाच्या जोरावर मग पुढे शंकराचार्य, ऋषिर प्रेम, जोरेबरत, विष्णू माया, प्रल्हाद यांसारख्या गाजलेल्या चित्रपटात आपल्या स्पष्ट शब्दोच्चार आणि अभिनयाने बंगाली चित्रपटसृष्टीवर अमीट छाप सोडली. काननदेवींचे नाव गाजू लागले होते. त्यांच्या नावाने चित्रपटाला गर्दी होत असे. विशेष म्हणजे विष्णू माया आणि प्रल्हाद या चित्रपटात तर कानन देवींनी चक्क मुख्य पुरुष भूमिका साकारल्या होत्या. प्रसिध्दी मिळाल्यावर आपले कानन बाला हे नाव बदलून त्यांनी काननदेवी केले. वयाच्या २१ व्या वर्षापर्यंत आपल्या सौंदर्याने आणि उत्कृष्ट अभिनयाने त्या लोकप्रिय अभिनेत्री म्हणून प्रसिध्द झाल्या होत्या.

राधा फिल्म कंपनीसोबत काम करत असताना कानन देवी सुपरस्टार बनल्या होत्या. त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये सर्वाधिक मानधन घेणाऱ्यांमध्ये त्यांचे नाव आघाडीवर होते. चित्रपटाचे बजेट १५-२० हजार रुपये आणि तिकीट सुमारे ३० पैसे असतांना होते, तेव्हा कानन एका गाण्यासाठी १ लाख रुपये आणि एका चित्रपटासाठी ५ लाख रुपये मानधन घेत असत. त्या काळातील त्या फॅशन आयकॉनही होत्या. चित्रपटांमध्ये कानन देवी यांनी परिधान केलेले कपडे, दागिने त्यांची केशरचना यांची सर्वस्तरातील महिलांकडून अनुकरून केले जात होते. त्या कुठे गेल्या की, त्यांना बघायची इच्छा असलेल्या लोकांची गर्दी जमायची त्यामुळे त्यांना मोठ्या सुरक्षेसह इच्छित स्थळी पोहचावे लागत असे.

काननदेवी यांनी त्यांच्या अभिनय कारकिर्दीत, एकूण ५७ चित्रपटांमध्ये काम केले, तर सुमारे ४० गाण्यांना आवाज दिला. चित्रपटसृष्टीतील त्या पहिल्या महिला अभिनेत्री होत्या, ज्यांना पुरुषप्रधान चित्रपट उद्योगात मॅडम संबोधले गेले. पुढे त्यांची प्रतिष्ठा इतकी वाढली की कोलकात्यातील एका कार्यक्रमात त्यांना येताना पाहून राज्याचे राज्यपालही आपली जागा सोडून उभे राहिले.

चित्रपटातील मूक युगा संपल्यानंतर चित्रपट बोलू लागला. या ध्वनीपटांमध्ये काननदेवींना यश गवसले. त्यांच्या अभिनय व गाण्याची चर्चा भारतातच नव्हे, तर हॉलिवूडच्या मासिकातदेखील झळकू लागली. उत्कृष्ट गायनामुळे, त्याकाळातील मेगाफोन या ग्रामोफोन कंपनीने त्यांना गायिका म्हणून नियुक्त केले होते. कानन यांनी भीष्मदेव चॅटर्जी, अनादी दस्तीदार यांसारख्या दिग्गजांकडून संगीताचे प्रशिक्षण घेतले होते. त्या न्यू थिएटर्स कंपनीच्या आघाडीच्या गायिका झाल्यात, परंतु १९४१ मध्ये कंपनीशी असलेला करार संपुष्टात आणत त्यांनी हिंदी आणि बंगाली चित्रपटांमध्ये काम करण्यास सुरुवात केली. हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते के. एल. सेहगल, पंकज मलिक, प्रथमेश बरुआ, पहाडी संन्याल, छबी बिस्वास, अशोक कुमार यांच्यासोबतही कानन देवींनी भूमिका केल्यात. जवाब या चित्रपटातील दुनिया ये दुनिया, है तुफान मेल हे कानन देवींचे गाणे इतके हिट झाले की त्यांनी ते नंतर हॉस्पिटल, बनफूल, राजलक्ष्मी या तीन चित्रपटांमध्ये वापरले.

१९३० मध्ये काननदेवींच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. शहर महाविद्यालयाचे प्राचार्य व ब्रह्म समाजाचे नेते हेरंबचंद्र मैत्रा यांचा मुलगा अशोक मैत्रा यांचा वाढदिवस होता. वाढदिवसाच्या पार्टीत अशोक यांनी मित्रांना सांगितले की, अभिनेत्री काननदेवी त्यांना भेटल्या तर आजचा वाढदिवस खऱ्या अर्थाने साजरा होईल. पार्टी झाली आणि मित्रांनी दारुच्या नशेत असणाऱ्या अशोक यांना काननदेवींच्या घराबाहेर सोडून दिली. नशेत असल्याने, अशोक तिथेच रस्त्यावर झोपले. मध्यरात्री काननदेवींना सूट-बूट घातलेला एक तरुण त्यांच्या घराखाली पडलेला दिसला. त्या खाली आल्या त्यांनी अशोक यांचे डोके मांडीवर घेतले. नशेत असलेल्या अशोक यांना हे स्वप्नच आहे असे वाटल्याने ते तसेच झोपून राहिले. अशा पहिल्याच भेटीने या दोघांमध्ये मैत्री झाली. मैत्रीचे रुपांतर लवकरच प्रेमात झाले. पण लग्नाची वेळ आली तेव्हा कुटुंबाने विरोध केला. ब्राह्मो समाजाच्या प्रमुखाची सिनेमात काम करणारी तरुणी सून होवू शकत नाही. अशोक मैत्रा यांचे वडील हेरंबचंद्र यांचे निधन झाले, तेव्हा दोघांनी १९४० मध्ये समाजाच्या विरोधात जावून विवाह केला. २५ वर्षीय काननदेवी आणि ३६ वर्षीय अशोक यांच्या विवाहाने कोलकाता शहरात गदारोळ माजला. शहरातील लोकांनी निषेध करण्यास सुरुवात केली.

त्याकाळात काननदेवींच्या घराबाहेर रोज निदर्शने होत. काननदेवी जिथे जात तिथे त्यांना विरोधातील घोषणाबाजी सहन करावी लागली. पण त्यांनी चित्रपटांमध्ये काम करणे सुरूच ठेवले. कानन यांची एक झलक पाहण्यासाठी रोज घराबाहेर उभी असणारी गर्दी आता विरोधकांमध्ये बदलली होती. रोजच्या आंदोलनामुळे अस्वस्थ झालेल्या कानन देवींनी सार्वजनिक कार्यक्रमांना जाणे बंद केले आणि नंतर घराबाहेर पडणे बंद केले. लोकांच्या वागण्यात बदल झाला होता. चित्रपटसृष्टीतील सहकारीदेखील यावर टोमणे मारु लागले. कानन यांच्या आयुष्यातील तो सर्वात वाईट काळ होता. या सगळ्याचा अशोक यांच्या मनःस्थितीवर वाईट परिणाम झाला. अखेरीस त्यांनी कानन यांनी चित्रपटात काम करु नये असे सुचविले. वयाच्या १० व्या वर्षी चित्रपटांमध्ये काम करण्यास सुरुवात केलेल्या कानन मात्र चित्रपट सोडण्यास तयार नव्हत्या. अखेरीस दोघात भांडणे सुरू झाली. अशोक त्यांना फोनवरही कोणासोबत बोलू देत नव्हते. अखेरीस वैतागून कानन यांनी चित्रपट सोडण्याऐवजी १९४५ मध्ये घटस्फोट घेत अशोक यांच्याशी असलेले संबंध तोडले. मात्र, अशोक यांची आई कुसुम कुमारी मैत्रासोबतचे त्यांचे संबंध अबाधित राहिले. काही वर्षांनंतर कुसुमकुमारी यांनी कानन यांच्या मांडीवरच जीव सोडला.

याच दरम्यान नशीबानेही दगा दिला. हॉस्पिटल' (१९४३) आणि 'चंद्रशेखर' (१९४७) हे चित्रपट अपयशी ठरले. अखेर काननदेवी यांनी चित्रपटांतून काही काळ विश्रांती घेण्याचे ठरवले. मात्र समाजात पहिल्यांदा आदर मिळवून देणारे म्हणून अशोक यांचे स्थान त्यांच्या मनात कायम राहिले. १९४७ च्या अखेरीस परदेशी चित्रपटउद्योग समजून घेण्यासाठी काननदेवींनी हॉलिवूडला भेट दिली. येथे क्लार्स गेबल, स्पेन्सर ट्रेसी, रॉबर्ट टेलर यांसारख्या हॉलिवूडच्या अनेक दिग्गज अभिनेत्यांना भेटण्याची संधी त्यांना मिळाली. परदेशातून परतल्यानंतर, कानन देवींनी स्वतःची निर्मिती संस्था काढून 'दर्पचूर्णा' (१९५२), ' नब बिधान' (१९५४), 'देबात्रा' (१९५५), 'आशा' (१९५६) आणि 'इंद्रनाथ श्रीकांत ओ अन्नदादीदी' (१९५९) हे चित्रपटांची निर्मिती करण्यासह त्यात अभिनय केला. अभय ओ श्रीकांतई (१९६५) हा त्यांचा शेवटचा चित्रपट होता.

दरम्यान १९४९ मध्ये काननदेवींनी बंगाल सरकारमध्ये ए. डी. सी. असणाऱ्या हरिदास भट्टाचार्य यांच्याशी लग्न केले. कोलकात्यातील टॉलीगंज येथील शाळेतील एका कार्यक्रमात दोघांची भेट झाली होती. १९४९ मध्ये कानन यांचा मुलगा सिद्धार्थ यांचा जन्म झाला. लग्नानंतर, हरिदास यांनी सरकारी नोकरी सोडली आणि कानन यांच्या निर्मिती संस्थेचे काम पाहण्यास सुरुवात केली. १९५२ पासून त्यांनी चित्रपटांचे दिग्दर्शन करण्यास सुरुवात केली. हरिदास यांनी चित्रपटांचे दिग्दर्शन केले, त्यांचे चित्रपट यशस्वी झाले आणि गाजलेही परंतु त्यांची ओळख नेहमीच काननदेवीचे पती म्हणूनच राहिली. मात्र यामुळे दोघांमध्ये वाद होवू लागले. अखेरीस ४ एप्रिल १९६७ रोजी हरिदासने काननचे घर सोडले मात्र दोघांनी घटस्फोट घेतला नाही. अखेरच्या काळात काननदेवी आजारी पडू लागल्या, तेव्हा हरिदास यांनीच त्यांच्यावर उपचार केले. कानन यांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठीही त्यांनी मदत केली. कानन सतत आजारी राहू लागल्या अखेरीस १७ जुलै १९९२ ला कोलकाताच्या बेलेव क्लिनीकमध्ये वयाच्या ७६ व्या वर्षी या अभिनेत्रीने या दुनियेला अलविदा म्हटले.

काननदेवींना त्यांच्या कारकिर्दीत देविका राणी आणि रुबी मेयर्स यांच्यानंतर चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान दादासाहेब फाळके पुरस्कार (१९७७) मिळाला. हा पुरस्कार मिळवणाऱ्या कानन देवी या पुरुषप्रधान चित्रपट उद्योगातील तिसऱ्या महिला होत्या. १९६८ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते. एका बंगाली सुपरस्टार गायिकेने अखेर इतिहास घडविला होता.

# नाफा मराठी चित्रपट महोत्सव २०२५उत्सवी वातावरणात संपन्न!




**राम कोंडिलकर**

संपूर्ण अमेरिका आणि कॅनडामधील मराठी रसिकांच्या तुडुंब प्रतिसादामुळे नाफा फिल्म फेस्टीव्हल २०२५ कमालीचा यशस्वी झाला. अडीच हजारांहून अधिक प्रेक्षक 'द कॅलिफोर्निया थिएटर' मध्ये या महोत्सवाचा आनंद लुटण्यासाठी उपस्थित होते. तीन दिवसांच्या या महोत्सवामुळे मनोरंजनाची दिवाळी साजरी झाल्याची प्रतिक्रिया या महोत्सवाचे आयोजक, नाफाचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत घोलप यांनी व्यक्त केले.

पहिल्या दिवशी भव्य ग्लॅमरस रेड कार्पेटच्या साथीने फिल्म अवार्ड नाईट रंगली. महाराष्ट्रातून आलेल्या कलावंतांना विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आणि त्यासोबत अत्यंत मानाचा 'नाफा जीवन गौरव' पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अमोल पालकरांना देण्यात आला. दुसऱ्या दिवशी मुख्य चित्रपट महोत्सव सुरु झाला तो अभिनेते सचिन खेडेकर यांच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषणाने. त्यांचं हे भाषण विशेष गाजलं. मराठी चित्रपटसृष्टीची सध्याची अवस्था अशी का आहे? मराठी चित्रपटांबद्दल का ओरड सुरु आहे? मराठी चित्रपट चालत नाहीत याला कोण जबाबदार आहे, अशा प्रश्नांचा वेध घेताना त्यांनी रोखठोक मतं परखडपणे मांडली. गेल्या काही वर्षांत मराठी चित्रपट न चालण्याची कारणं त्यांनी आकडेवारीसह मांडली. या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी 'नाफा' सारखी संस्था कसा पुढाकार घेऊ शकते, नेमकं काय काम होणं गरजेचं आहे, याबद्दलही ते सविस्तर बोलले.

दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' आणि गजेंद्र अहिरे दिग्दर्शित 'स्नोफ्लॉवर' या चित्रपटांचं स्क्रिनिंग आणि त्यासोबतच 'नाफा'ची निर्मिती असलेल्या तीन शॉर्टफिल्म्सही दाखवण्यात आल्या. सोबत सोनाली कुलकर्णी, स्वप्नील जोशी आणि वैदेही परशुरामी यांच्यासाठी खास 'मीट अँड ग्रीट' आयोजित करण्यात आलं होतं, ज्याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वर्कशॉप्सच्या माध्यमातून प्रेक्षकांना आणि कलाकारांना थेट संवादाची संधी मिळाली. अश्विनी भावे, अवधूत गुप्ते यांनी त्यांच्या अनुभवांवर आधारित सत्रं घेतली, तर प्रसाद फणसे आणि रोहन फणसे यांनी डबिंगसंदर्भात खास वर्कशॉप घेतलं, जे सहभागींसाठी अतिशय माहितीपूर्ण ठरलं. विशेष म्हणजे अमोल पालेकर यांचं आत्मचरित्र ऐवज आणि त्याचं इंग्रजी भाषांतर यांचं अमेरिकेतील प्रकाशन नाफाच्या मंचावर पार पडलं. प्रकाशनानंतर विक्रम वाटवे यांनी अमोल पालेकर आणि संध्या गोखले यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीसाठी अमेरिकेचा क्रिकेटपटू सौरभ नेत्रावळकर खास उपस्थित होता.







'नाफा फिल्म फेस्टिव्हल'च्या दुसऱ्या दिवशीची सुरुवात झाली एका खास सन्मानाने, अमेरिकेच्या संसदेने 'नाफा'ला दिलेलं मानपत्र, श्री ठाणेदार यांनी 'नाफा'च्या मंचावर अभिजीत घोलप यांना प्रदान केलं. यानंतर तीन नव्या शॉर्टफिल्म्सचं स्क्रीनिंग पार पडलं आणि आदल्या दिवशी दाखवलेल्या तीन शॉर्टफिल्म्सचे दिग्दर्शक श्रीमिरजकर (योगायोग), हर्ष महाडेश्वर (सबमिशन), संदीप करंजकर(द गर्ल विथ रेड हॅट) यांच्यासोबत डॉ. गौरी घोलप यांनी संवाद साधला. त्यानंतर बेस्ट शॉर्टफिल्म (डम्पयार्ड), दुर्वा नांदापूरकर (बेस्ट स्क्रीन प्ले-भंगी), भूषण पाल (बेस्ट सिनेमॅटोग्राफी- डम्पयार्ड) रुचिर कुलकर्णी(बेस्ट एडिटिंग - चेंजिंग रूम), प्रफुल्ला खारकर (विशेष उल्लेखनीय - बिर्याणी), गार्गी खोडे (विशेष उल्लेखनीय - सबमिशन) या स्टुडंट सपोर्टींग विभागातील शॉर्ट फिल्म्सना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

त्यानंतर अनिल भालेराव दिग्दर्शित छबिला आणि निखिल महाजन दिग्दर्शित 'रावसाहेब' या चित्रपटाचं स्क्रीनिंग झालं. सोनाली कुलकर्णी, स्वप्नील जोशी, सचिन खेडेकर, डॉ. मोहन आगाशे यांच्या मास्टर क्लासेसला रसिक प्रेक्षकांनी सखोल दाद दिली.

यानंतर झालेल्या पॅनल डिस्कशनमध्ये मराठी सिनेमा वर्तमान, भवितव्य आणि वाटचाल या विषयावर मधुर भांडारकर, अवधूत गुप्ते, डॉ. मोहन आगाशे, गजेंद्र अहिरे, स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी , आदिनाथ कोठारे यांनी आपली मतं मांडली या पॅनल डिस्कशनचे सूत्रसंचालन वैदेही परशुरामी हिने केले.

क्लोजिंग सेरेमनीच्यावेळी नाफा अध्यक्ष अभिजीत घोलप, अर्चना सराफ, रिया ठोसर, अनुप निमकर, लक्ष्मण आपटे, वृषाली मालपेकर, मानसी देवळेकर आणि इतर सर्व नाफा सदस्यांनी प्रेक्षकांशी हितगुज केले. अभिजीत घोलप यांनी पुढील वर्षीच्या नाफामध्ये काय नवं असेल, कोणते नवे देश गाठायचे आहेत, आणि या उपक्रमाचं पुढचं पाऊल काय असावं, याविषयी माहिती दिली.

**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**-email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)